दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -१२२ | मंगळवार दि.०६ जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-122 | Tuesday, Dt.06 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4







# बीडमधील रीलस्टारच्या अंगावरुन ट्रॅक्टरची ट्रॉली गेली

## पत्नी फेसबुक लाईव्ह करतानाच आक्रित घडलं

ट्रॅक्टरच्या ट्रॉलीखाली सापडून एका ऊसतोड कामगार तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. ऊस वाहतुकीदरम्यान झालेल्या या भीषण अपघातात कुटुंबाचा कर्ता पुरुष काळाच्या पडद्याआड गेला. विशेष म्हणजे, मयत गणेश डोंगरे हा सोशल मीडियावरील रीलस्टार होता आणि दुर्दैवाने त्याची पत्नी फेसबुक लाईव्ह करत असतानाच तिच्या डोळ्यादेखत हा अपघात घडला. या घटनेमुळे संपूर्ण बीडमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. उसाच्या हंगामात येथील लाखो कुटुंबे उदरनिर्वाहासाठी राज्याच्या विविध भागांत तसेच परराज्यात ऊसतोडणीसाठी स्थलांतर करतात. बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी (सोन्नाखोटा) येथील रहिवासी गणेश डोंगरे आणि त्यांची पत्नी अश्विनी हेही पोटाची खळगी भरण्यासाठी ऊसतोडणीसाठी बाहेर पडले होते. मेहनतीच्या घामातून आपल्या कुटुंबाचं भविष्य घडवण्याचं स्वप्न उराशी बाळगून गणेश डोंगरे हे पत्नी आणि तीन चिमुकल्या मुलींसह ऊसतोडणीसाठी गेले होते. मात्र, ऊस वाहतुकीदरम्यान झालेल्या भीषण अपघातात ट्रॅक्टर ट्रॉली त्यांच्या अंगावरून



### पत्नी फेसबुक लाईव्ह करतानाच आक्रित घडलं

या दुर्घटनेला आणखी वेदनादायक बनवणारी बाब म्हणजे, अपघाताच्या वेळी अश्विनी फेसबुकवर लाईव्ह होती. लाईव्ह सुरू असतानाच ट्रॉली गणेश यांच्या अंगावर पडली. पतीचा मृत्यू पत्नीच्या डोळ्यादेखत घडताच तिच्यावर जणू आभाळ कोसळलं. काही क्षणांतच ही बातमी सोशल मीडियाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात पसरली आणि संपूर्ण जिल्हा अक्षरशः हादरून गेला.

### अंगावरुन ट्रॅक्टरची ट्रॉली गेल्याने मृत्यू

यावर्षी ते लातूर जिल्ह्यातील एका साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात आपल्या चिमुकल्या मुलींसह ऊसतोडणी करत होते. शनिवारी दुपारच्या सुमारास ऊसाने भरलेला ट्रॅक्टर घेऊन ते साखर कारखान्यावर माप होण्याच्या प्रतीक्षेत थांबले होते. याच वेळी जवळून जाणाऱ्या दुसऱ्या ट्रॅक्टरची ट्रॉली अचानक गणेश यांच्या अंगावर कोसळली. या भीषण अपघातात गणेश यांचा जागीच मृत्यू झाला, तर आणखी एक कामगार जखमी झाला. काही क्षणांतच अश्विनीच्या डोळ्यांसमोर होत्याचं नव्हतं झालं.

गेल्याने गणेश यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे त्यांचे वृद्ध आई-वडील, पत्नी आणि तीन चिमुकल्या मुलींवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी (सोन्नाखोटा) येथील गणेश डोंगरे यांच्याकडे केवळ एक एकर जमीन होती. भोळसर वृद्ध आई-वडील असल्याने कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी गणेश यांच्या खांद्यावर होती. पत्नी अश्विनी ही गुणवान आणि कष्टाळू होती. मात्र, तीन मुलींचे पालनपोषण, आई-वडिलांची

(उर्वरीत पान २ वर)

# शिवसेना शाखा व शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन

बीड /प्रतिनिधी

शिवसेनेचे प्रेरणास्थान आदरणीय बाळासाहेब ठाकरे साहेब व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या प्रेरणेतून शिवसेना सचिव श्री. संजयजी मोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत नवले साहेब यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि त्यांचे



शुभहस्ते गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी येथे शिवसेनेच्या शाखांचे भव्य व उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन संपन्न झाले.

शाखाप्रमुख अभय भांडवलकर, उपशाखा प्रमुख शुभम नरवडे, सचिव प्रतीक मेंडके यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी अँड. चंद्रकांत नवले यांचा बुलंद हुंकार एका नव्या परिवर्तनाची साक्ष देत होते.

या कार्यक्रमासाठी तालुका प्रमुख उद्धवजी मडके, विक्रमराजे भोसले, शहरप्रमुख मुकेशजी

(उर्वरीत पान २ वर)

# स्त्री जन्माचे स्वागत सरकारने देशभर शासकीय उपक्रम म्हणून राबवावे - वैभव स्वामी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातच नव्हे तर स्त्री जन्माचा घटता दर हा महाराष्ट्रासह देशात चिंतेचा विषय ठरत आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्यासह केंद्र सरकारने सुद्धा प्रतिनिधिक स्वरूपात नवीन वर्षाची सुरुवात ही स्त्री जन्माचे स्वागत या उपक्रमाने देशभर राबवावी असे आवाहन पत्रकार वैभव स्वामी यांनी केले आहे.

बीड येथील जिल्हा रुग्णालयात एक जानेवारी रोजी जन्मलेल्या मुलींना नवीन ड्रेस त्यांच्या आईला नवीन साडी आणि मिठाई वाटप करून जन्मलेल्या मुलींचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. काळाची गरज लक्षात घेऊन

### बीडचा आदर्श घेऊन छत्रपती संभाजीनगर येथे गुणवंत कामगार संघटना स्त्री जन्माचे स्वागत पुढील वर्षी पासून करणार - पी एस गुजर



राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. बीडमध्ये राबवलेल्या या उपक्रमाची दखल घेऊन छत्रपती संभाजी नगर येथील पी एस गुजर यांनी पुढील वर्षी पासून अशाच पद्धतीचा स्तुत्य उपक्रम मराठवाड्याच्या राजधानी मध्ये आम्ही पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली महानगर नागरिक विकास फाउंडेशन आणि मराठवाडा गुणवंत कामगार विकास संस्था यांच्या संयुक्त

(उर्वरीत पान २ वर)

# वसुलीसाठी मल्टिस्टेटच्या कर्जदारांवर गुन्हे दाखल करा

### ज्ञानराधाच्या १०७ जप्त प्रॉपर्टीच्या लिलावाच्या परवानगीसाठी विशेष कोर्टात प्रस्ताव दाखल

### विभागीय सहनिबंधकांनी घेतला ज्ञानराधा, साईराम , राजस्थानी जिजाऊसह सर्व मल्टिस्टेट प्रकरणांचा आढावा



बीड /प्रतिनिधी

ज्ञानराधा, जिजाऊसह सर्व मल्टिस्टेट संस्थांच्या कर्जदारांकडून वसुली करण्यासाठी कोणतीही तडजोड न करता कडक कारवाई करा. सहकार्य न करणाऱ्या कर्जदारांवर वेळप्रसंगी १०१, १०५, १३८ कलमान्वये गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट आदेश लातूरचे विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी दिले.

सोमवारी (दि. ५) दुपारी १२ वाजता जिल्हा मध्यवर्ती बँकेत आयोजित आढावा बैठकीत त्यांनी अवसायक व प्रशासकांना स्पष्ट शब्दांत सुनावले

दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी जिजाऊसह सर्व मल्टिस्टेट संस्थांच्या अवसायक व प्रशासकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. बैठकीस एमपीआयडीचे उपजिल्हाधिकारी सतीश सोनी, जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार, समृत जाधव, ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिनभैय्या उबाळे, महेश डोंगरे, बाबू ढवाण, कैलास वीर तसेच सर्व अवसायक उपस्थित होते.

(उर्वरीत पान २ वर)

### प्रजासत्ताकदिनापूर्वी रास्तारोकोचा इशारा : प्रा.सचिन उबाळे

जप्त केलेल्या प्रॉपर्टींच्या लिलावाची तारीख तात्काळ जाहीर करणे ही आमची मुख्य मागणी आहे. लिलावाची तारीख लवकर जाहीर झाली नाही, तर प्रजासत्ताकदिनापूर्वी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील महालक्ष्मी चौकात ठेवीदारांना घेऊन भव्य रास्तारोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन भैय्या उबाळे यांनी दिला. आंदोलनाच्या तयारीसाठी मराठवाडाभर दौरा करून ठेवीदारांच्या भेटी घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांचे तिरुपती हॉस्पिटल ठरत आहे रुग्णांसाठी लाभदायक

### ७० वर्षीय महिला रुग्णाची कृत्रिम सांधा (बॉल) प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी..!



बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नगर नाका येथे काही महिन्यांपूर्वी सुरू झालेले जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ डॉ बालाजी सूर्यभानराव नवले यांचे तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि स्पाईन केअर सेंटरयेथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत गोरगरिबांना न परवडणारे मोठमोठे ऑपरेशन मोफत स्वरूपात होत असल्याने..गरजू रुग्णांना त्याचा लाभ,फायदा करून देणारा आहे.. अशातच मणक्याच्या गुंतागुंतीच्या आणि त्रासदायक शस्त्रक्रिया मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या हाताने यशस्वीपणे पार पडत आहेत.. ७०वर्षीय महिला रुग्णाच्या कमरेच्या सांध्यामध्ये (बॉल) कुजल्याने प्रचंड त्रास चालता न येणे उठता बसता त्रास थोडीशीही हालचाल झाली की अति त्रास होत असल्याने तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका येथे डॉ नवले यांना उपचारासाठी भेटल्यानंतर एक्स-रे मध्ये ७० वर्षीय रुग्णाला कृत्रिम सांधा बॉल प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याची गरज असल्याचे कळले..तात्काळ रुग्णाला सर्व प्रोसिजर सांगितल्यानंतर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णाची यशस्वीपणे कृत्रिम सांधा (बॉल) प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पडली. या शस्त्रक्रियेसाठी भूलतज्ञ डॉ सोमनाथ वाघमारे,डॉ श्रीमती इथापे मॅडम तसेच शस्त्रक्रिया सहाय्यक म्हणून सचिन मुरकुटे,

(उर्वरीत पान २ वर)

# भावाने बहिणीला साडी घेतली, बहिणीनेही भावाला घेतला शर्ट..!

परळी ।प्रतिनिधी

परळीतील मुंडे भाऊ बहिणीची जोडी ही महाराष्ट्राच्या राजकारणात एक महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणून ओळखली जाते. त्यांच्यातील गोड नाते, मधल्या काळातील राजकीय मतभेद आणि इतर प्रत्येक लहानात लहान बाब देखील या भाऊ बहिणींच्या संदर्भाने राज्यात चर्चिले जातात. या भाऊ बहिणींच्या जोडीने आज परळीतील एका दुकानात केलेली कपड्यांची खरेदी असाच एक चर्चेचा विषय बनली आहे.

परळी शहरातील तापडिया कुटुंबियांच्या कल्पना साडी व फॅमिली




शॉपिंग मॉल या वस्त्र दालनाचे उद्घाटन सकाळी मंत्री पंकजाताई मुंडे व आमदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संपूर्ण मॉल ची पाहणी करताना धनंजय मुंडे यांनी भगिनी पंकजा ताईंना आपण पूर्वी नेहमी आपल्या आवडीची साडी आणायचो, अशी आठवण काढत पंकजाताईंना साडी घेण्याबाबत

(उर्वरीत पान २ वर)


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय....

# बंडोबांचे आव्हान !

महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मंगळवार (३० डिसेंबर) ही अंतिम तारीख असून सर्वच राजकीय पक्षांनी बंडखोरी टाळण्यासाठी लपवाछपवीचा मार्ग स्वीकारला आहे. कारण त्यांच्यासमोर बंडोबांचे आव्हान कायम आहे. विशेष म्हणजे ही बंडखोरी सर्वपक्षीय आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतही तेच चित्र आहे. सोमवारी उमेदवारांची यादी जाहीर होऊ लागल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांत बंडखोरी उफाळून आली. त्यामुळे बंडखोरांची नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान राजकीय पक्षांसमोर उभे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सोमवारी दुपारनंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.), ठाकरे सेना व मनसे यांनी आपले काही उमेदवार जाहीर केले. मात्र यात काही निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले गेल्याने सर्वच राजकीय पक्षांतील इच्छुकांनी नाराजीचा सूर आळवला. राष्ट्रवादी काँग्रेसचे (श. प.) मुंबईतील जे मोजके माजी नगरसेवक होते, त्यातील मुंबई अध्यक्ष राखी जाधव, बबन कनावजे, धनंजय पिसाळ, मनीषा रहाटे या चारही माजी नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन दुस-या पक्षात प्रवेश केला. राखी जाधव यांनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. राखी जाधव यांनी भाजपात प्रवेश केल्याने भाजपची घाटकोपरमध्ये ताकद वाढली आहे. राखी जाधव २०१२ व २०१७ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३१ मधून निवडून आल्या होत्या. मनसे नेत्या स्नेहल जाधव, भाजप नेत्या अर्चना पाटील यांनी ठाकरे सेनेत प्रवेश केला. ठाकरे सेनेचे चंद्रकांत वायंगणकर यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. ठाकरे गटात प्रभाग क्र. ९५ च्या उमेदवारीवरून आमदार अनिल परब आणि वरुण सरदेसाई यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. परब माजी नगरसेवक चंद्रकांत वायंगणकर यांच्यासाठी आग्रही होते,

तर सरदेसाई यांनी दिवंगत नेते श्रीकांत सरमळकर यांच्या जावयासाठी अर्ज मागितल्याने परब संतप्त झाले. अखेर परब यांनी माघार घेतल्याने शास्त्री यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, या वेळी परब आणि सरनाईक यांच्यातील अंतर्गत मतभेद समोर आले. मुंबई महानगरपालिकेवर भगवा झेंडा फडकवण्यासाठी उमेदवारी जाहीर करताना भाजपने सावध भूमिका घेतली आहे. सोमवारी भाजपने ६६ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सुरुवातीला २२७ पैकी दीडशेहून अधिक जागा लढण्याची भाजपची तयारी होती. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची कोंडी झाली होती. शिवसेनेने याबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर दोन्ही पक्षांत ८-१० दिवसांपासून बैठकांचे सत्र सुरू होते. अखेर भाजप आणि शिवसेनेत २०७ जागांवर एकमत झाले. भाजपच्या पहिल्या यादीत ठाकरेंच्या शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करत नुकताच भाजपात प्रवेश केलेल्या तेजस्वी घोसाळकर यांना प्रभाग क्र. १ मधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

तसेच भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांचे पुत्र नील सोमय्या यांना वॉर्ड क्र. १०७ मधून तिकिट देण्यात आले आहे. २०७ जागांपैकी १२८ जागा भाजप लढवणार आहे, तर शिवसेनेच्या वाट्याला ७९ जागा आल्या आहेत. अजून २० जागांवर दोन्ही पक्षांमध्ये तोडगा निघालेला नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांचे निकटवर्तीय आणि भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांना मानखुर्द शिवाजीनगरच्या प्रभाग क्र. १३५ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. युवा मोर्चा अध्यक्ष तेजिंदरसिंग यांना मुंबईतील वॉर्ड क्र. ४७ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे सेनेने सोमवारी सायंकाळपर्यंत अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर न करताच निश्चित १२५ उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. उमेदवार पळवापळवी टाळण्यासाठी ठाकरे सेनेने महायुतीला चकवा देत एबी फॉर्मचे गुपचूप वाटप केले. ठाकरे सेना १५० जागा लढवणार आहे म्हणे. मनसे ७० जागा लढवणार आहे. मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसने सोमवारी ८७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.

या यादीत खासदार चंद्रकांत हंडोरे यांची कन्या प्रज्योती हंडोरे यांना प्रभाग क्र. १४० मधून उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच आमदार अस्लम शेख यांच्या मुलाला आणि बहिणीला उमेदवारी देण्यात आली आहे. नाशिक व छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीत महायुतीत बिघाडी झाली असून महायुतीतील घटकपक्ष आपल्या सोयीनुसार युती करून निवडणुका लढवणार असल्याचे चित्र आहे. संभाजीनगरमध्ये भाजपसोबत युती करण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळत नसल्याने शिवसेना शिंदे गटात अस्वस्थता आहे. पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, भाजप सकारात्मक प्रतिसाद देत नसेल तर एकनाथ शिंदे युतीसाठी पर्यायी मार्ग काढतील. शिवसेनेने ४१ जागांचा प्रस्ताव दिला होता. सुमारे ८-९ बैठका झाल्या तरी त्यातून ठोस मार्ग निघाला नाही. नाशिक महानगरपालिकेसाठी महायुतीचा जागावाटपाचा तिढा न सुटल्याने महायुतीत फूट पडली असून शिंदे आणि अजित पवार गट एकत्र लढणार असल्याचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी जाहीर केले.

# वृत्तपत्रांचा प्रवास आजपर्यंतचा !

बीड / छत्रपती संभाजीनगर

बदलत्या काळासोबत ज्याला बदलणे जमले त्यालाचा यश प्राप्त करणे सोपे असते. याचा व्यक्तीप्रमाणे माध्यम क्षेत्राचा विस्तार आणि आजची स्थिती याचं एक चिंतन आणि येणाऱ्या काळातील बदलाचा वेध आणि याचं निमित्त अर्थात दर्पण दिन.सिंधुदुर्ग जिल्ह्यात जन्म झालेल्या बाळशास्त्री जांभेकर यांचा कार्यालेख खरोखरच अफाट आहे. मराठी माणसांनी जन्म दिलेल्या दोन व्यवसायांनी नंतर उत्तुंग अशी भरारी घेतली. यात दर्पणकार जांभेकर यांनी मुहूर्तमेढ केल्यानंतर वृत्तपत्र व्यवसाय एक आहे. सोबत स्मरण करावे असा व्यवसाय म्हणजे दादासाहेब फाळके यांनी सुरू केलेला चित्रपट व्यवसाय याचीही आठवण आपण ठेवली पाहिजे.



या दोन्ही व्यवसायांवर आज लाखो कुटूंबे अवलंबून आहेत. इतकेच नव्हे तर देशाला दिशा आणि नेतृत्व देणारी व्यक्तीमत्वे ही याचा मधून आपणासमोर आली आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधी, संविधान देशाला देणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच देशाचे पंतप्रधान राहिलेले दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या आरंभिक काळात वृत्तपत्रांची भूमिका महत्वाची होती.

कधी काळी केवळ मुद्रीत माध्यम आणि त्यासोबत रेडिओ हे माध्यम होते त्यातही रेडिओवर शासकीय नियंत्रण असलेला काळ होता त्यामुळे मुद्रीत माध्यमाला अधिक महत्व होते. नंतरच्या काळात टेलीव्हिजन चॅनेलचा प्रारंभ झाला. त्यातही अनेक वर्षे देशात शासन यंत्रणेची माध्यमे म्हणून त्याकडे बघितले जात होते. त्याकाळातही मुद्रीत माध्यमाचे महत्व कायम राहिले.

नंतर ९० च्या दशकात वाहिन्यांची सुरूवात झाली. आज आपण याचा प्रवास बघितला तर तो थक्क करणारा असा आहे. आजच्या तारखेस देशात सर्व भाषांची मिळून ११५० चॅनेल्स आहेत आणि यातील केवळ वृत्तप्रधान वाहिन्यांची संख्या ४३३ इतकी आहे. एकूण चॅनेल संख्येच्या ४० टक्के असे प्रमाण होते. यात सर्वाधिक २११ वाहिन्या हिंदी भाषी असून मराठी वृत्तवाहिन्यांची संख्या १४ आहे. वाहिन्यांची संख्या वाढली त्यानंतर नवमाध्यमांचा उदय झाला असे असले तरी आजही मुद्रीत माध्यमाला असणार माध्यम महत्व आजही तितकेच आणि कारण आपल्या देशात आजही 'लिहिलेल्या आणि छापलेल्या' शब्दांवर' सर्वांचा विश्वास आहे.

मुद्रीत माध्यमे संपणार अशी ओरड सुरू झाली, मात्र त्यानंतरही आजवर या माध्यमांचा विस्तार सुरूच आहे. एक पिढी वयात येताना दुसरी पिढी जन्म घेतेय अशा आपल्या विस्तीर्ण आसेतू हिमालय अशा भारत देशात नवे वृत्तपत्र दाखल होते. त्यावेळी ते आधीच्या वृत्तपत्रांवर फारसा परिणाम करत नाही याचं कारण म्हणजे प्रत्येक वृत्तपत्र आपला नवा वाचकवर्ग घेऊन येतो.

मात्र नवमाध्यमांनी सर्वांना बदलणे आवश्यक आहे असा स्पष्ट संदेश दिला आहे. यानुसार बड्या वृत्तपत्रांनी आपल्या ऑनलाईन आवृत्त्या सुरू केल्या आहेत. त्यातूनही व्यवसाय वृद्धी होईल असा होरा बांधून त्याची ऑनलाईन वर्गणी भरून वर्गणीदार केले जात आहेत असे सध्याचे चित्र आहे. मात्र झपाट्याने माहिती समोर आणणाऱ्या या काळात सशुल्क ऑनलाईन वृत्तपत्र विक्री त्यांना यापुढील काळात प्राप्त होईल याची खात्री नाही. वृत्तपत्राला त्याच्या ऑनलाईन उपस्थिती ती देखील मोफत ठेवून त्याच्या आधारे डिजिटल मार्केटींग मधून व्यवसाय हा उत्तम पर्याय आहे. हे ज्यांना कळले त्यांचे भविष्य दोन्ही बाजूंनी चांगले राहणार आहे.

कोणत्याही तंत्राचे फायदे जसे असतात तसे तोटेही असतात. नवमाध्यमे वापरताना त्यात अनेक जण विविध पद्धतीने वापरतात यामुळे युट्यूब चॅनेलचे पेव आलेले आपणास दिसते. याला नेमके अधिष्ठान नाही. परिणामी या माध्यमांचा मुळ प्रवाहात प्रवेश होणे अवघड आहे. त्यांना मान्यता मिळण्याची शक्यता सध्या नाही आणि भविष्यात ती झाली तरी त्यावर नियंत्रण ही समस्या ठरू शकते.

इन्स्टाग्राम आणि फेसबूक व (ट्विटर )आताचे एक्स या माध्यमांचा वापर वेगळा हेतू,वेगळा आणि गती देखील वेगळीच आहे. त्यात क्षणभंगूरता अधिक प्रमाणात आहे. त्यात 'एन्फ्लुएन्सर' होण्याचे भाग माध्यमांना अशक्य असे आहे. कधी काळी चळींीळेप ूळींह तळीळेप असणारी पत्रकारीता व्यावसायिक स्पर्धेने पूर्णपणे बदलून टाकली आणि ग्रामीण भागात याचे चित्र अगदीच वेगळे झालेले आहे. यातील व्यावसायिक भाग सोडला तर आजही ही वृत्तपत्रे एका अर्थाने समाजाला मार्ग दाखवण्याचे काम करीत आहे.

आपल्या देशात ३ स्तंभ अर्थात सेना, न्यायालय आणि शासन यंत्रणा यांना मान्यता आहे. माध्यमांनी यात 'समाज प्रहरी' म्हणून आपले स्थान चौथा स्तंभ स्वरूपात उभे केले आहे. त्याचाही गौरवपूर्ण उल्लेख दर्पण दिना निमित्त करून दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मरण करू आणि आगामी काळात देखील हे माध्यम दीपस्तंभासारखे सर्वांना मार्गदर्शन करेल अशी अपेक्षा करूया.

शब्दांकन...

**– प्रशांत दैठणकर**

– जिल्हा माहिती अधिकारी, बीड, तथा प्रभारी उपसंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, छत्रपती संभाजीनगर.

# जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींचा विवेक जागा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन

## दत्तनगर वस्तीशाळेवरील शालेय विद्यार्थ्यांना तात्काळ न्याय द्यावा – डॉ. गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवन केंद्रीय जिल्हा परिषद शाळा अंतर्गत दत्तनगर वस्तीशाळेवरील शालेय विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याच्या निषेधार्थ आज सोमवार दि.०५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

दत्तनगर वस्तीशाळेसाठी २००७-०८ मध्ये सुसज्ज इमारत बांधण्यात आली असतानाही रस्त्यावर अतिक्रमण करून जाण्याचा मार्ग बंद केल्यामुळे गेल्या सव्वा दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली उघड्यावर शाळा भरवावी लागत आहे. या गंभीर बाबीकडे जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींचे वारंवार लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (रा. लिंबागणेश) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,शेख



मुबीन, रामधन जमाले, राजकुमार कदम डी.जी.तांदळे, नितिन जायभाये, डॉ.तांदळे, बाजीराव ढाकणे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे, राजेंद्र भिसे,शहाजी भुबे,अंजाबापु अडागळे,कौसर कुरेशी,शालिंदा गरड,भारत भोमदळ, संतोष आडागळे,वचिष्ठ आठवे आदी पालक व ग्रामस्थ सहभागी होते.

आंदोलनादरम्यान जिल्हाधिकारी जागे व्हा, पालकमंत्री अजितदादा जागे व्हा, आ. विजयसिंह पंडित जागे व्हा अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना न्याय देण्यात दिरंगाई केल्याबद्दल संबंधित तहसीलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करावी, तसेच तात्काळ अतिक्रमण हटवून रस्ता खुला करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.

# गेवराई होणाऱ्या दर्पण दिन कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहावे

तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर

नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताताई बाळराजे पवार यांच्या सह नवनिर्वाचित नगरसेवकांचा होणार सत्कार

गेवराई : प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गेवराई तालुका पत्रकार संघाच्या वतीने मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय शेजारी पत्रकार भवनात दर्पणदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाय नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताताई बाळराजे पवार नवनिर्वाचित नगरसेवका कु. सोनाली सुभाष सुतार यांच्यासह सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा या कार्सयक्रमात सत्कार होणार असून या कार्यक्रमास सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे ,असे आवाहन गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर व पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

दर्पणकार कै.बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता पत्रकार भवन येथे दर्पण दिन साजरा करण्यात येणार असुन यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन आ. विजयसिंह पंडित, माजी मंत्री बदामराव पंडित, भाजपा नेते बाळराजे पवार, तहसीलदार संदिप खोमणे, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, गटविकास अधिकारी अनिरूद्ध सानप, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, पोलिस निरीक्षक किशोर पवार, गेवराई उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ सुरज कोठावळे आदींची प्रमुख उपस्थिती रहाणार आहे. तरी या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व पत्रकार व नागरिकांनी उपस्थित रहावे ,असे आवाहन गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, सचिव दिनकर शिंदे, उपाध्यक्ष सखाराम शिंदे, कार्याध्यक्ष गणेश क्षीरसागर, सदस्य अय्युब बागवान, सुभाष सुतार, प्रा. राजेंद्र बरकसे, जुनेद बागवान, वैजिनाथ जाधव, प्रसाद कुलकर्णी, सुशिल टकले, ड हारुण शेख, गजानन चौकटे, शेख इरशाद, सय्यद सिराज, सुदर्शन देशपांडे, भास्कर सोळुंके, दत्ता वाघमारे, लक्ष्मण राऊत, अलताफ कुरेशी, अजहर इनामदार, लक्ष्मण आहेर, भरत खराद, धनंजय बजगुडे, श्रीराम बाराहत्ते, रामकिसन तळेकर, गोपाल चव्हाण, मनोज आहेर, विजय नाटकर, कालिदास काकडे, सुरेश गांधले, सुनिल मिसाळ, लक्ष्मण सरपते, सय्यद मुदस्सीर, सतिष वाघमारे व सर्व पत्रकार बांधव आदींने केले आहे.




# रांजणी झेडपी शाळेला वाढदिवसानिमित्त संगणक, पुस्तके व दिनदर्शिकांची भेट

कळंब ।प्रतिनिधी

तालुक्यातील रांजणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस सामाजिक बांधिलकीतून विविध शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. मुला-मुलींच्या वाढदिवसानिमित्त शाळेस उपयुक्त भेटवस्तू देत एक आगळा-वेगळा उपक्रम राबविण्यात आला.

मदन मनोहर बनसोडे यांनी त्यांची नात कु. आर्या सुरेंद्र बनसोडे हिच्या वाढदिवसानिमित्त शाळेस संगणक (कॉम्प्युटर) भेट दिला. तसेच कु. शोहेब मतीन पटेल याच्या वाढदिवसानिमित्त मतीन पटेल यांनी शाळेच्या वाचनालयासाठी उपयुक्त पुस्तके भेट दिली. याच कार्यक्रमात प्रदीप ठोंबरे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना दिनदर्शिका वाटप करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इलाही पटेल, उपाध्यक्ष माणिक गायकवाड, सरपंच राजाभाऊ आगरकर, उपसरपंच अन्सार शेख, ग्रामपंचायत सदस्य अलीमभाई शेख, नाना गायकवाड, तटामुक्ती अध्यक्ष मतीन पटेल, चेअरमन प्रल्हाद गोरे, प्रदीप ठोंबरे, लतीब पटेल, जानू मिया बागवान, सुरेंद्र बनसोडे यांच्यासह शिक्षक, पालक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना मिळणार असून उपस्थितांनी देणगीदारांचे कौतुक केले.

पान १ वरून...

**शिवसेना शाखा व ....**

महाजन, युवासेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, युवा सेना शहरप्रमुख गणेश पवार, प्रकाश काका नरनाळे, नागेशजी मिठे, शिवराज उगले, स्वप्नील आबुज (विशेष उपस्थिती), अँड. सचिन गायकवाड, अनिकेत भांडवलकर, पवन काळे, ओमकार गायकवाड, रवी मेंडके,

कृष्णा गायकवाड, दत्ता चौधरी, आर्यन प्रताप भांडवलकर,मराठे, अजय शिंदे, महादेव काळे, अंकुश नन्नवरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्तित होते.

तद्नंतर नगर रोड फुलसांगवी फाटा येथे शिवराज उगले, युवा सेना लोकसभा प्रमुख आष्टी मतदार संघ यांच्या शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले, शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, युवा सेना जिल्हाप्रमुख सुमित भैया कोळपे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या उद्घाटन समारंभ प्रसंगी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले यांनी पहिल्यांदा जिल्हाप्रमुख असताना केलेल्या कामांची माहिती दिली यामध्ये संपूर्ण जिल्ह्यामध्ये गाव, तांडा, वाडी, वस्ती, पाड्यापर्यंत शिवसेना पक्षाचे विचार पोहोचविण्यासाठी असंख्य शाखा स्थापन करून विविध ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद मध्ये सत्ता स्थापन करून शिवसेनेचा भगवा फडकविला असल्याचे सांगितले. तसेच कार्यकर्त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी झुणका भाकर केंद्र, पोलीस पाटील पदी नेमणूका, शाळा/ कॉलेजेस यासह विविध कामे मिळवून दिल्याचे सांगितले. आणि आता महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, संसदरत्न मा. खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब, शिवसेना सचिव मा. श्री. संजयजी मोरे साहेब यांना अपेक्षित असलेले काम आपल्या सर्वांना मिळून करावयाचे असून यासाठी संपूर्ण गेवराई मतदार संघात दौरा करून, प्रत्येक गावात शाखा स्थापन करून, धर्मवीर आनंदजी दिघे साहेब नागरी सहायता कक्ष स्थापन करून आणि जनतेच्या समस्यां सोडवून मतदार संघात शिवसेना पक्षाचे पोषक वातावरण तयार करावयाचे असून नगरपरिषद निवडणुकीत रणनीती आखण्यासाठी मला जास्तीचा वेळ मिळाला नसल्याने येणाऱ्या पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये शिवसेना पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी होतील यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करावयाचे आहे असे सांगितले. वंदनीय बाळासाहेबानंतर मा.ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब हेच खरे महाराष्ट्राला न्याय देणारे ठरले असून ते सातत्याने १८-१८ तास जनतेसाठी काम करतात त्यांचीच प्रेरणा घेऊन मीही स्वतः १८-१८ तास काम

पान १ वरून...

करण्यास तयार असून कोणत्याही वेळी अडचण आल्यास मला हाक द्या मी आपल्या मदतीसाठी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही दिली.

यावेळी उपजिल्हाप्रमुख श्री. नारायण शिंदे, गेवराई विधानसभा प्रमुख श्री. नवनाथ गवते, गेवराई शहर प्रमुख श्री. मुकेश महाजन, गेवराई तालुकाप्रमुख श्री. उद्धव मडके, श्री. विक्रमराजे भोसले, शिरूर तालुकाप्रमुख श्री. सुनील सोनवणे, श्री. बिभीषण मोघे, श्री. नागेश मिठे, प्रा. सचिन उबाळे, श्री गणेश पवार, श्री. प्रकाश नरनाळे, सरपंच श्री. दिलीप उगले, श्री. स्वप्निल आबुज सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वसुलीसाठी मल्टिस्टेटच्या....**

आतापर्यंतच्या सर्व प्रकरणांचा आढावा घेताना विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी सर्व मल्टिस्टेट संस्थांचे तातडीने ऑडिट करण्याचे आदेश दिले. एमपीआयडीचे प्रलंबित प्रस्ताव वरिष्ठांकडे मंजुरीसाठी तात्काळ पाठवा, कर्जवसुली सक्तीची करा आणि सहकार्य न करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, जप्त केलेल्या प्रॉपर्टीच्या लिलावाची तारीख तात्काळ जाहीर करावी, या मागणीसाठी ११ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठेवीदार संघर्ष कृती समितीने आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेत आजची बैठक पार पडल्याची माहिती प्रा. सचिनभैय्या उबाळे यांनी दिली.

ज्ञानराधाच्या लिलावाचा प्रस्ताव दाखल

बहुचर्चित ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या ८० प्रॉपर्टी ११ जुलै २०२५ रोजी, तर २७ प्रॉपर्टी २३ डिसेंबर २०२५ रोजी जप्त करण्यात आल्या आहेत. एकूण १०७ प्रॉपर्टींची किंमत तब्बल ५८.५४ कोटी रुपये आहे. तसेच जिजाऊ मॉसाहेब मल्टिस्टेटच्या २२.०१ कोटी रुपये किमतीच्या २६ प्रॉपर्टी ९ सप्टेंबर रोजी जप्त करण्यात आल्या आहेत. या दोन्ही मल्टिस्टेटच्या जप्त प्रॉपर्टींच्या लिलावासाठी विशेष कोर्टात परवानगी मागितली असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी सतीश सोनी यांनी दिली.

**बीडमधील....**

जबाबदारी आणि वाढता खर्च यामुळे गावाकडील उत्पन्न अपुरे पडत होते. पत्र्याच्या शेडमध्ये राहणाऱ्या या कुटुंबाला अत्यंत नाजूक आर्थिक परिस्थितीशी झुंज द्यावी लागत होती. त्यामुळे कुटुंबाच्या गरजा भागवण्यासाठी गणेश आणि अश्विनी यांनी मुंगळा ट्रॅक्टरद्वारे ऊसतोडणी करण्याचा निर्णय घेतला. गेल्या काही वर्षांपासून हे दाम्पत्य महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन ऊसतोडणीचे काम करत

पान १ वरून...

होते.

**स्त्री जन्माचे स्वागत....**

विद्यमाने राबवणार आहोत असे जाहीर केले आहे. त्याचबरोबर स्त्री जन्माचा जन्मदर वाढण्यासाठी राज्यभर चळवळ राबवणे गरजेचे आहे असे मत देखील त्यांनी व्यक्त केले आहे.

स्त्री जन्माचा दर वाढवण्यासाठी राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने पुढाकार घेऊन या संदर्भात ठोस निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी कठोरपणे करणे गरजेचे आहे.गर्भलिंग निदान करून मुलींना जन्मापूर्वीच मारणाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई अंमलात आणणे गरजेचे आहे असे मत पत्रकार वैभव स्वामी यांनी व्यक्त केले आहे.

**मनका विकार तज्ञ ...**

विष्णूबाळ झोडगे हेही उपस्थित होते.. शस्त्रक्रियेनंतर रुग्णांच्या नातेवाईकांनी तिरुपती हॉस्पिटल आणि डॉ बालाजी नवले यांची आभार मानले..तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये अशाच प्रकारचे अनेक मोठमोठ्या शस्त्रक्रिया योजनेअंतर्गत मोफत होत असल्याने गरजू गरीब रुग्णांना याचा चांगला फायदा होत आहे. तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्येमान,मनका,हातापायाची हाडांची, मणक्याची, शस्त्रक्रिया मोफत होत आहेत.त्यामुळे गरजू रुग्णांनी हाडाच्या, मणक्याच्या ,कृत्रिम सांधारोपण लिगामेंट इंजुरी,शस्त्रक्रियेसाठी अवश्य भेट द्यावी.असे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल च्या वतीने जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मनकाविकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांनी केले आहे. नगर नाक्यावर लाईफ लाईन हॉस्पिटलच्या समोर तिरुपती हॉस्पिटल येथे भेट देण्यासाठी ७७७०००३२२९ ८६६८२१२३३१ या दूरध्वनीवर संपर्क करून आपली अपॉइंटमेंट फिक्स करावी असे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि स्पाईन केअर सेंटरच्या वतीने करण्यात आली आहे..

**भावाने बहिणीला....**

आग्रह केला. क्षणातच धनुभाऊ यांनी पंकजाताई यांना आपल्या आवडीच्या साड्या खरेदी करून दिल्या आणि त्याचे नगदी बिलही दिले.पंकजाताईंनी देखील साडी खरेदी नंतर लागलीच आपल्या भावाला शर्ट खरेदी करून दिले. धनंजय मुंडे यांनी यावेळी आपल्या मनोगतात देखील आम्ही बहीण भावांनी या दालनाचे उद्घाटन प्रत्यक्ष खरेदी करून केले असल्याचे आवर्जून सांगितले.एकंदरीत भाऊ बहिणींच्या या खरेदीतून प्रेम बंधनाच्या भावना दिसून आल्याच्या चर्चा दिवसभर रंगल्या होत्या.

# शिरूरची योगीता बनली नायगावच्या सावित्रीमाईची लेक

## नायगावात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीचा भव्य उत्सव साजरा




शिरूर कासार /प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मगावी नायगाव येथे भव्य दिव्य जयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या जयंतीनिमित्त सावित्रीमाईंच्या भव्य स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्राच्या उभारणीसाठी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले.

जयंतीनिमित्त सावित्रीमाईंच्या स्मारकापासून कार्यक्रमस्थळापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीमध्ये शिरूर कासार येथील सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली व कु. योगीता गवळी यांच्या नेतृत्वाखाली महिलांची आणि तरुणींची भव्य रॅली सहभागी झाली.शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी सहभागामुळे शिरूरची योगीता बनली नायगावच्या सावित्रीमाईची लेकअशी भावना उपस्थितांमध्ये निर्माण झाली.

या भव्य सोहळ्याचे आयोजन ग्रामविकास मंत्री मा.ना.जयकुमार यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते.व्यासपीठावर विधानपरिषद सभापती मा.राम शिंदे,अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा.ना.छगन भुजबळ, मंत्री मा.ना.शंभुराज देसाई,मंत्री मा. ना.मकरंद पाटील,सावता महाराजांचे वंशज ह.भ.प.सावता महाराज वसेकर,सावता परिषदेचे कल्याण आखाडे,समता परिषदेचे सुभाष राऊत,सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी,सातारा जिल्हाधिकारी,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नायगावच्या सरपंच स्वातीताई जमदाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या सोहळ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून लाखोंच्या संख्येने महिला व फुलेप्रेमी उपस्थित होते. विशेष म्हणजे या मेळाव्यात शिरूर कासारकरांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिस्तबद्ध रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सावित्रीमाईंच्या विचारांना नवी दिशा देणारा हा सोहळा सामाजिक परिवर्तनाचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला.

## संस्कारचे मुख्याध्यापक विनायक जोशी सेवानिवृत्त

# विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडवण्याचं कार्य जोशी सरांनी केलं- डॉ. सारिका क्षीरसागर



बीड ।प्रतिनिधी

अध्यापन हे केवळ नोकरी नसून पवित्र व्रत आहे, चांगला विद्यार्थी घडवण्यापेक्षा चांगला माणूस घडवणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट आहे, हातात खडू, मनात आदर्श ,आणि डोळ्यात विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडवण्याचं संस्कारक्षम कार्य संस्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायक जोशी यांनी केले आहे ,असे प्रतिपादन बीडच्या नूतन नगरसेविका डॉ. सारिका ताई क्षीरसागर यांनी केले आहे

संस्कार विद्यालयाचे आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक विनायक जोशी हे ३१ डिसेंबर रोजी ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापुर्तीचा कार्यक्रम गोपाळ आपारमेंट व जोशी परिवाराच्या वतीने आयोजित केला होता त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर नगर सेवक आदित्य माने, मराठवाडा शिक्षक संघाचे ज्येष्ठ नेते सामाजिक कार्यकर्ते डी जी तांदळे ,सरचिटणीस राजकुमार कदम, मुख्याध्यापक संघाचे विभागिय अध्यक्ष जी एम पैठणे, शिक्षण विस्ताराधिकारी मधुकर तोडकर, तुकाराम पवार ,मुख्याध्यापक कमलाकर कुलकर्णी, अनिता कुलकर्णी, इंदुमती जोशी नगरसेवक आदित्य माने इत्यादी उपस्थित होते.प्रारंभी सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जीएम पैठणे, मधुकर तोडकर, ॲड. सुभाष पिसोरे, ॲड.अमृत पाठक यांनीही आपले विचार व्यक्त केले .१९९३ ला जोशी सरांची संस्कार विद्यालयात प्रथम नियुक्ती होती. ३२ वर्ष निरपेक्ष सेवा केली गणित आणि विज्ञान विषयात त्यांचं प्राविण्य होतं. राज्यस्तर ते जिल्हा स्तर शिक्षकांचे प्रशिक्षक म्हणून एसएससी बोर्डाचे नियमक, शिक्षक संघाचे शहर सचिव व ब्राह्मण संघटनेचे सचिव तसेच बीड जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे कोषाध्यक्ष म्हणून हे त्यांनी उत्कृष्ट कार्य केलेआहे.

या कार्यक्रमास पूर्णवादीची किशोर देशमुख, विवेक पारगावकर, मुख्याध्यापक रघुनाथ रुचके, भारत खाकरे, गणेश जोशी, लातूर जिल्हा परिषदेचे अधिकारी सतीश पाठक ,डॉ. सुरेश पिंपळे डॉ. उपेंद्र कॉलनी, डॉ. प्रशांत सानप , डॉ.जगन्नाथ सहस्त्रबुदे महेश मालकरे, प्रा.जयंत फुले कर डॉ. शहादेव जगताप प्रा. बाळासाहेब जोशी, प्रा. ईश्वर नाईकवाडे ,डॉ. उषा ढगे, अविनाश काळे ,शक्ती नंदन बाबर, सत्यकुमार कदम, गणेश नागरगोजे, श्रीमती आशा खाडे, ज्ञानेश्वर गवते, एपीआय संदीप दूनघव, गणेश मुळे ,भाऊसाहेब डोंगरे, पोलीस तुकाराम पवार, महेश ठोकरे ई. उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी तर आभार प्रीती पिंपळे यांनी मानले.

# डॉ. ज्योती मेटे यांनी घेतल्या जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

## लोकनेते विनायकराव मेटे विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्धार




बीड ।प्रतिनिधी

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्राम प्रणित लोकनेते विनायकराव मेटे विकास आघाडीच्या वतीने इच्छुक उमेदवारांची महत्वपूर्ण बैठक दि. ५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता साक्षाळ पिंपरी ता. जि. बीड येथील श्री. नगद नारायण जिनिंग येथे पार पडली. या बैठकीत शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी स्वतः इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

या बैठकीस शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, नारायणराव काशीद, मराठवाडा अध्यक्ष अनिल घुमरे, सुहास पाटील, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे, जिल्हा उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, सचिन कोटूळे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे, सुनील शिंदे,सुनील कुटे, मनिषा कुपकर, पंडित माने, ज्ञानेश पानसंबळ, माऊली शिंदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिरूर, गेवराई व बीड तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या शिवसंग्रामच्या उमेदवारांचा सामाजिक सहभाग, संघटनात्मक कामगिरी, स्थानिक प्रश्नांची जाण, जनतेशी असलेला संपर्क तसेच पक्षविचाराशी असलेली निष्ठा या बाबींचा सखोल आढावा डॉ. ज्योती मेटे यांनी मुलाखतीदरम्यान घेतला.

## आदर्श शिक्षक आणि ज्येष्ठ पत्रकार यांना सन्मानित करून

# वडवणीत पत्रकार संघ दर्पण दिन साजरा करणार - अँड विनायकराव जाधव

वडवणी /प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील ज्या शिक्षकांना जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला त्या शिक्षकांना आणि वडवणी येथील ज्येष्ठ पत्रकारांना सन्मानित करून आज ६ जानेवारी रोजी दर्पण दिन साजरा करण्यात येणार आहे. या दर्पण दिनाच्या कार्यक्रमास सर्व पदाधिकारी आणि पत्रकार प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्ष अँड विनायकराव जाधव यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे साहेब, प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे, प्रदेश संपर्कप्रमुख वैभवजी स्वामी सर, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिलराव सावंत सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा बीड जिल्हा व वडवणी तालुका यांच्या वतीने आज मंगळवार दिनांक ६ जानेवारी रोजी सकाळी ९.०० वाजता बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेले पहिले मराठी वर्तमानपत्र दर्पण दिनानिमित्त दर्पण दिन साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्त वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद मार्फत आदर्श शिक्षक शासकीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा सत्कार व ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार तसेच विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्याचा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तरी सदरील कार्यक्रम आपल्या ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल, सिंधफना शाळेच्या पाठीमागे, वडवणी येथे आयोजित केला आहे. या दर्पण दिनाच्या कार्यक्रमात यावर्षीचे सत्कारमूर्ती ठरले आहेत, गोरक्षनाथ मुंडे सर, तुकाराम राठोड सर,रमेश धायतिडक सर,ज्येष्ठ पत्रकर बुवासाहेब शिंदे पाटील. या सत्कार सोहळ्यास आणि दर्पण दिनाच्या आयोजित कार्यक्रमाला सर्व पदाधिकारी, सदस्य, पत्रकार यांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, डिजिटल मीडिया वडवणी आणि हल्ला विरोधी कृती समिती वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## गुरुनानक प्राथमिक विद्यालयात सावित्रीमाई फुले जयंती उत्साहात साजरी

बीड ।प्रतिनिधी

श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सां) संचलित, गुरुनानक प्राथमिक विद्यालय शाहूनगर, बीड येथे सावित्रीमाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार मॅडम होत्या.यावेळी विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन कारण्यात आले.यात शाळेतील अनेक विद्यार्थिनींनी सावित्रीमाईची वेशभूषाआणि भूमिका साकारली यामध्ये जाधव समिक्षा, ऐश्वर्या आमटे, गोडसे शिवज्ञा, पव्हणे आदिरा,अनुश्री गदळे, तुरुकमारे शुभ्रा, वनवे अवंतीका, स्वामी अनुजा, काळे शुभांगी, काळे शुभांगी, बुराणे आरोही, दुधाळे प्राजक्ता, शहाणे अमृता, जापडिया संजना, जापडिया ज्योती या विद्यार्थ्यांनीनी वेशभूषा केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यार्थिनींनी पुष्पगुच्छ देऊन सर्व शिक्षकांचे स्वागत केले. काही विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सावित्रीमाई याच्या जीवनावर प्रकाश टाकला. यामध्ये शेळके आरोही, शंतनू शेळके,विराज पव्हणे, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती डोंगरे मॅडम यांनी केले.कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्रीमती पव्हणे मॅडम, मुंडे मॅडम, शेळके भाग्यश्री, शेळके मॅडम, श्री गदळे सर, ठोकरे सर, तांदळे सर यांनी सहकार्य केले.

# शेतकऱ्यांना कृषी माहिती देण्यासाठी ‘किसान कॉल सेंटर’ सेवा प्रभावी

बीड /प्रतिनिधी

कृषी क्षेत्रातील अद्ययावत माहिती शेतकऱ्यांपर्यंत जलद व प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने किसान कॉल सेंटर ही योजना राबविण्यात येत आहे. २१ जानेवारी २००४ रोजी सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्यांच्या स्थानिक भाषेत तात्काळ उत्तरे देणे हा आहे.

या सेवेअंतर्गत कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन, फलोत्पादन, रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन, जलसंधारण, कृषी अभियांत्रिकी, कृषी विपणन, जैवतंत्रज्ञान आदी विषयांवरील माहिती शेतकऱ्यांना दिली जाते. किसान कॉल सेंटरचे व्यवस्थापन सेवा प्रदात्यांमार्फत करण्यात येत असून इन्फो किसान संचार लिमिटेड (आयएफएससी) यामार्फत ही सेवा पुरविण्यात येते.

सध्या या केंद्रामध्ये १८०० पेक्षा अधिक टेली सल्लागार कार्यरत असून, ही सेवा सकाळी ६.०० ते रात्री १०.०० या वेळेत उपलब्ध आहे. शेतकरी टोल-फ्री क्रमांक १८००-१८०-१५५१ वर संपर्क साधून आवश्यक माहिती मिळवू शकतात. आवश्यकतेनुसार एसएमएस अलर्ट, कॉल रेकॉर्डिंग तसेच वेबसाइटद्वारेही माहिती देण्यात येते.

महाराष्ट्रातील किसान कॉल सेंटर सेवा कार्यालय पुणे येथे कार्यरत आहे. शेतकऱ्यांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी केले आहे.



बीड - श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती महंत ह.भ.प. शिवाजी (बाबा) महाराज यांनी पावन माता नर्मदा परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून नारायणगडावर मंगल आगमन केले.या शुभप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी त्यांचे दर्शन घेऊन मनोभावे शुभाशीर्वाद घेतले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




सांगली - येथील हौसाई वृद्धाश्रमात सावित्रीमाई फुले जयंती निमित्त सामजिक प्रबोधनपर भव्य महिला सन्मान फेरीचे उद्घाटन करताना सौ. रश्मीताई भंडारे.सोबत खा. रामदासजी आठवले फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संदेशभाऊ भंडारे भारती न्यू लॉ महाविध्यालयाच्या बेबीआयेशा इनामदार, जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी वर्षा पाटील,राजमाता महिला डी एड कॉलेजच्या अमृता दीक्षित आदिसह मान्यवर.

### टीसी हरवला आहे...

मेघराज विलास नेवडे रा कामखेडा ता. जि.बीड या नावाचा १२ वी पास चा टीसी बीड कमखेडा ता.जि. बीड .बस प्रवासामध्ये हरवला आहे.

जर कोणाला सापडल्यास मो. न.९३०७८०८११३ या क्रमांकावर संपर्क साधावा..

### जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकर यांचे न्यायालयात**

**शिवराम भानुदास बोराडे**

**विरूध्द**

**ग्रामसेवक ग्रा.पं.फत्तेपुर ता.भोकरदन जि.जालना**

ज्या अर्थी अर्जदार **श्री नामे शिवराम भानुदास बोराडे रा.कुकडी ता.भोकरदन जि.जालना** येथील रहिवाशी असुन अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज **त्यांचा स्वतःचा जन्म दिनांक २२.०६.१९८९ मौजे फत्तेपुर** येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणेसाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही. तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.१९.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**भोकरदन**

### जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकर यांचे न्यायालयात**

**भानुदास गंगाराम बोराडे**

**विरूध्द**

**ग्रामसेवक ग्रा.पं.वाकडी/कुकडी ता.भोकरदन जि.जालना**

ज्या अर्थी अर्जदार **श्री नामे भानुदास गंगाराम बोराडे रा.कुकडी ता.भोकरदन जि.जालना** येथील रहिवाशी असुन अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज **देवून त्यांचा स्वतःचा जन्म दिनांक २०.०४.१९७० मौजे कुकडी** येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणेसाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही. तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.१६.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**भोकरदन**

### जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकर यांचे न्यायालयात**

**गणेश भानुदास बोराडे**

**विरूध्द**

**ग्रामसेवक ग्रा.पं.वाकडी/कुकडी ता.भोकरदन जि.जालना**

ज्या अर्थी अर्जदार **श्री नामे गणेश भानुदास बोराडे रा.कुकडी ता.भोकरदन जि.जालना** येथील रहिवाशी असुन अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज **देवून त्यांचा स्वतःचा जन्म दिनांक ०५.११.१९९१ मौजे कुकडी** येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणेसाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही. तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.१६.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**भोकरदन**

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ०२/२०२६**
**वंदना भ्र. महेश कुलकर्णी व इतर वि. निरंक**
**(मार्फत अ‍ॅड. एल. जी. कुलकर्णी, गेवराई)**

अर्जदार - १. वंदना भ्र. महेश कुलकर्णी,
वय ५५ वर्षे, धंदा-शेती, रा. उमापुर, ता. गेवराई जि. बीड.
२. जयश्री भ्र. गोपालराव कुलकर्णी,
वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. सदर.

ज्याअर्थी मयत महेश पि. गोपालराव कुलकर्णी, रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २३/११/२०२० रोजी मौजे रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत आले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ व २ यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत महेश पि. गोपालराव कुलकर्णी, रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:- ०९/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# ह.भ.प.लोखंडे महाराज यांना गंगाई बाबाजी समाजभूषण पुरस्कार प्रदान



पाटोदा ।प्रतिनिधी

समाजातील अध्यात्मिक,धार्मिक व तर्कशास्त्रीय क्षेत्रात आगळेवेगळे व समाजोपयोगी कार्य करणारे ह.भ.प.राजू महाराज लोखंडे यांची गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला. गंगाई-बाबाजी पुरस्कार संयोजन समितीच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला असून त्यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण दिघोळ ता.जामखेड येथील जिल्हा परिषद शाळेत झाले.शालेय जीवनापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केले.पाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले.काही काळ वैराग्यमूर्ती ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत सेवा केल्यानंतर अध्यात्मिक साधनेला पूर्णतः वाहून घेतले.

ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तारखेच्या तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण ज्ञान आत्मसात केले.कोणताही ज्योतिषशास्त्राचा औपचारिक अभ्यास न करता केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तीची जन्मतारीख, वार तसेच जीवनातील संभाव्य घटना अचूकपणे सांगण्याची अद्भुत क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे.त्यांच्या अनेक भाकितांचा अनुभव आजवर खरा ठरलेला असून राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक राजकीय व सामाजिक अंदाज चर्चेचा विषय ठरले आहेत.विशेष म्हणजे नैराश्यात सापडलेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्यातील येणाऱ्या सकारात्मक क्षणांची जाणीव करून देत आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांपासून परावृत्त करण्याचे समाजकार्य महाराज सातत्याने करत आहेत. तसेच सामाजिक, अध्यात्मिक व पर्यावरण विषयक जनजागृतीचे कार्य अहोरात्र सुरू आहे.

यापूर्वी त्यांना समाजरत्न पुरस्कार १४ नोव्हेंबर २०२५ प्रदान करण्यात आला असून आता गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ जाहीर झाल्याने त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव झाला आहे.पुरस्कार मिळाल्याबद्दल हभप राजू महाराज लोखंडे यांचे आ.सुरेश धस,उद्योजक परमेश्वर शेठ येवले इंदौर,शिवसेना उपजिल्हाप्रमुख व चराठा पंचायत समिती इच्छुक उमेदवार गणेश उगले,राजुरी जिल्हा परिषद गटाचे शिवसेना महायुती इच्छुक उमेदवार सतीश शेळके,लिंबागणेश जिल्हा परिषद गटाचे एनसीपी इच्छुक उमेदवार संजय पवार,यांच्यासह या पुरस्कार निवडीबद्दल सर्व स्तरातून हभप राजू महाराज यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




## सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड ।प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची दारे खुली करून समाजातील महिलांना स्वातंत्र्य आणि सशक्तीकरणाचे मार्ग दाखवले. त्यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते संगमेश्वर आंधळकर यांच्या पुढाकारातून जिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले, या शिबिराला रक्त दात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्त विविध उपक्रम राबिविले जातात. सध्या जिल्ह्याभरामध्ये रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा आहे. या पार्श्वभूमीवर महापुरुषांच्या जयंतीनिमित्त अनावश्यक गोष्टीला फाटा देत सामाजिक कार्यकर्ते संगमेश्वर आंधळकर यांनी पुढाकार घेत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. जिल्हा रुग्णालयात सकाळी ११ वाजता क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून या रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी अर्पण केलं त्यांना खऱ्या अर्थाने अभिवादन कराचे असेल आपणही समाजासाठी काहीतरी केले पाहिजे आणि यासाठी रक्तदान करून आपण या महापुरुषांचा विचार जिवंत ठेवत पुढे नेणे गरजेचे असल्याचे मत यावेळी संगमेश्वर आंधळकर यांनी व्यक्त केले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख संतोष जाधव, संपादक संजय मालानी, मल्हारी जाधव, सुहास जायभाये, दत्ता प्रभाळे, अमोल पाठक, अक्षय यादव, नितीन गायकवाड, नदीम शेख, देवा गव्हाणे, गजानन चित्रे, अक्षय यादव, नितीन दोडके, बालाजी घरत, विनोद मगर, नाना जावळे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



## शिवणी येथे डॉ भदंत आनंद कौसल्यायन महाथेरो यांची जयंती साजरी

बीड ।प्रतिनिधी

जागतिक कीर्तीचे बौद्ध धर्मगुरू डॉ भदंत आनंद कौसल्यायन महाथेरो यांची १२१ वी जयंती प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने महाविहार धम्मभूमी,शिवणी येथे साजरी करण्यात आली. यावेळी भिक्खु धम्मशील यांनी भंतेजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.ते पुढे बोलताना म्हणाले की डॉ.भदंत आनंद कौसल्यायन यांचे पाली साहित्यात अत्यंत महत्वाचे योगदान होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर संपूर्ण देशामध्ये बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार भंतेजिनी केला. पाली साहित्य आणि बौद्ध वांग्मयावर अनेक ग्रंथ त्यांनी लिहून त्यांनी बौद्ध धम्माच्या पुनर्जीवनासाठी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीला पुढे घेऊन जाण्यासाठी अत्यंत महत्वाचे योगदान दिले आहे .२२ मे १९७७ रोजी आदरणीय भंतेजी हे बीडला आले होते. त्यांच्या हस्तेबीड तालुक्यातील शिवणी येथे दोन दिवशीय धम्मदीक्षा सोहळा संपन्न झाला होता आणि त्याच वेळी त्यांच्या हस्ते एका बोधिवृक्षाचे रोपण ही करण्यात आले होते. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने शिवणी येथे सहा एक्कर जमीन घेऊन त्या परिसराला डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर असे नाव देण्यात आले असून दरवर्षी भंतेजींची जयंती साजरी करण्यात येत असते. यावेळी पु. भिक्खु धम्मशील थेरो, पु. भंते बुद्धबोधी, इंजि. वसंत तरकसे, भास्कर सरपते, अंकुश नाना डोळस, परमेश्वर विद्यागर, सनी वाघमारे, पंचशीला सरपते आदींची उपस्थिती होती.




## पोलीस वर्धापन दिनाच्या निमित्ताने सपोनि सानप, उपनिरीक्षक जाधवर यांच्याकडून युवकांसाठी प्रेरणादायी संवाद संपन्न

बीड /प्रतिनिधी

दि.५ जानेवारी २०२६ रोजी पोलीस वर्धापन दिनाच्या निमित्ताने पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे सपोनि सुभाष सानप यांनी मातोश्री विद्यालय वंजारवाडी तसेच पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा या ठिकाणी विद्यालयाच्या युवक-युवतींसोबत संवाद साधून त्यांना पोलीस खात्याची काम करण्याची पध्दत तसेच वाहतुकीचे नियम याविषयी संवाद साधला.

यावेळी चौसाळा जि.प.शाळेचे मुख्याध्यापिका हंपे मॅडम व शिक्षकवृंद उपस्थित होते तसेच पाली येथील शाळेचे मुख्याध्यापक श्री.लाड सर व विद्यालयाचे शिक्षकवृंद उपस्थित होते आणि वंजारवाडी येथील मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक नागरगोजे व शिक्षकवृंद उपस्थित होते.यावेळी महिला भगिनी व मुलींची सुरक्षितता, वाहतुकीचे नियम, वडीलधार्यांचा मान सन्मान, देशासाठीची कर्तव्ये, सायबर सुरक्षा, गुड टच बॅड टच, डायल ११२, हेल्पलाईन नंबर १०९८, बालविवाह, बालकामगार लहान मुलांबद्दल गुन्हे, महिला हेल्पलाईन १०९१ या विषयी विस्तृत माहिती दिली. नशेच्या पदार्थाचे सेवनाचे दुष्परिणाम, सोशल मिडीयाचा गैरवापर, मोबाईलचे होणारे दुष्परिणाम तसेच मोबाईलवरील ॲप्स, इंस्ट्राग्राम, फेसबुक, ट्विटर, टेलिग्राम, व्हाट्सॲप इत्यादी ॲपमुळे होणारे गुन्हे याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच यावेळी पो.ह.नागेश पायाळ यांनी जि.प.माध्यमिक शाळा चौसाळा येथे आपले मनोगत व्यक्त केले.

या अभियानात पोलीस हवालदार नागेश पायाळ, आदिनाथ मुंडे, पांडूरंग दराडे, विष्णु काकडे, त्रिंबक कुडके, पोलीस हवालदार चालक संतोष हारके, चालक दत्ता कदम यांनी सहभाग नोंदवला.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदासाठी तरुणांना मोफत प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

लातूर /प्रतिनिधी

भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेची तयारी करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे नवयुवक आणि नवयुवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे १९ जानेवारी, २०२६ ते ३ एप्रिल, २०२६ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६६ आयोजित करण्यात येत आहे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींनी १८ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रावर हजर रहावे. या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास आणि भोजन सुविधा पुरविल्या जाणार आहेत.अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्याशी ईमेल (training. pctcnashikgmail.com) , दूरध्वनी (०२५३-२४५१०३२) किंवा व्हॉट्सॲप (९१५६०७३३०६) द्वारे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.


## युरियाचा पुरेसा साठा उपलब्ध

### रासायनिक खतांचा तुटवडा नाही - कृषी विकास अधिकारी

लातूर /प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये रब्बी हंगामाच्या पेरण्या पूर्ण होवून पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. जिल्ह्यात रासायनिक खतांच्या संतुलित वापरासाठी विविध प्रकारच्या खतांचे ग्रेड आवश्यक त्या प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत. जिल्ह्यामध्ये खतांची टंचाई परिस्थिती नाही.

तरीही काही भागांमधून युरिया या खताच्या संदर्भामध्ये कृषी निविष्ठा विक्री केंद्रामध्ये युरिया खत उपलब्ध असताना शेतकऱ्यांना नाही म्हणणे, वाढीव दराने विक्री करणे व युरिया या खतासोबत इतर कृषी निविष्ठांची खरेदी करण्याची सक्ती करणे अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. शेतकऱ्यांना युरिया संदर्भामध्ये काही तक्रारी असतील त्यांनी तात्काळ तालुकास्तराव कृषी अधिकारी, गुण नियंत्रण यांच्याकडे किंवा जिल्हास्तरावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर किंवा लातूर जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांच्याकडे संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनी केले आहे.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# श्रीम.शेख मिनाज यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

आष्टी - (प्रतिनिधी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आष्टी नं. २ येथील सहशिक्षिका श्रीमती शेख मिनाज सिकंदर यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल गंगाई – बाबाजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्ता, नाविन्यपूर्ण उपक्रम व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांचा हा सन्मान करण्यात आला. श्रीमती शेख मिनाज या मूळच्या आष्टी, जि. बीड येथील असून त्यांनी यापूर्वी जि. प. प्रा. शाळा पांढरी येथे सात वर्षे सेवा बजावली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र. १ अभियानांतर्गत स्वच्छता मॉनिटर या घटकावर विद्यार्थ्यांचे स्वच्छतेविषयक व्हिडिओ व छायाचित्रे शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करून ६० टक्के गुण मिळवले. त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे पांढरी शाळेला तालुक्यात प्रथम क्रमांक मिळून तीन लाख रुपयांचे बक्षीस प्राप्त झाले होते.




तसेच शाळेत विविध शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून तालुका व जिल्हास्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून दिला. मंथन, नवोदय व शिष्यवृत्ती अशा स्पर्धा परीक्षांसाठी अतिरिक्त तासिका घेऊन दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीस पात्र केले. कमी कालावधीत विद्यार्थ्यांशी समरूप होण्याची त्यांची प्रवृत्ती व शैक्षणिक कामामुळे शाळेसह तालुक्यात त्यांचे कार्य सर्वदूर पोहोचले आहे. या कार्याची दखल घेत शेतकरी संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शिक्षण क्षेत्रातील राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली. दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी आष्टी येथे मा. आ. भीमराव धोंडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी त्यांचे आई - वडील, शेख अफजल सर, आमीर शेख, फिजा मॅडम, समीर शेख, फैज भैय्या, मुख्याध्यापक प्रकाश सातपुते सर, सतीश पोले सर, नवगिरे सर, मोटे सर, अझहर शेख सर, इनामदार मॅडम, उत्तम पवार सर, खंडागळे सर, जाकीर शेख, राजेंद्र लाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे साहेब, मुख्याध्यापक तायराम गळगटे सर, नारायण तरटे सर, संजय कोकाटे सर, अशोक पवार, आयुब पठाण सर, चंद्रकांत शिंदे सर, अफसाना मॅडम, पवार मॅडम, सुनिता झांजे मॅडम, शेंदुरकर मॅडम, काळे मॅडम तसेच केंद्र आष्टी नं. १ मधील सर्व शिक्षक - शिक्षिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव शिक्षणाचे महत्त्व व स्त्री सशक्तिकरणाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला

अंबड /प्रतिनिधी

दि.३ जानेवारी २०२६ रोजी अंबड शहरातील विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत थोर समाजसुधारिका स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबड वार्ताचे संपादक तसेच तैलिक महासभा, जालना जिल्हाध्यक्ष मा.श्री बळीराम भाऊ राऊत हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री पंडित गायकवाड व गुरुकुलचे संचालक मा.श्री संजय जाधव सर यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संस्थेचे शिक्षक योगेश हरणे सर यांनी तर प्रास्ताविक प्रमोद



मस्के सर यांनी केले.यावेळी शाळेचे विद्यार्थी अभिजित लोणकर, गायत्री जाधव,शिवराज सोमासे,विश्वास पोटे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रभावी भाषणे सादर केली.विशेषत इयत्ता ५ वी ई मधील विद्यार्थिनी गायत्री जाधव हिचे भाषण उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे ठरले.तिच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल मा. श्री बळीराम भाऊ राऊत यांच्या हस्ते तिला बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी मा.श्री संजय जाधव सर यांनी आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमाला मा. श्री संजय जाधव सर,योगेश हरणे सर,प्रमोद मस्के सर,सौ. शितल जाधव मॅम,सौ.योगिता शिंदे मॅम तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव,शिक्षणाचे महत्त्व व स्त्री सशक्तीकरणाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

# वीणापूजनाने आजपासून चैतन्यानंद स्वामी पुण्यतिथी सोहळ्यास प्रारंभ

आष्टी - (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील देवळाली पानाची येथे प. पू. ब्र. भू. सद्गुरू श्री स्वामी चैतन्यानंद महाराज यांचा ५५ वा पुण्यतिथी सोहळा आज मंगळवार, दि. ६ जानेवारीपासून मोठ्या भक्तिभावात सुरू होत आहे. दि. ६ ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञ (संगीत) व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोहळ्याच्या प्रारंभी सकाळी ९ वाजता स्वामींची प्रतिमा, ग्रंथ व शिवमहापुराण कथाकार ह. भ. प. मंगेश महाराज दाताळकर यांची भव्य मिरवणूक निघणार असून, त्यानंतर संत-महंत व मान्यवरांच्या हस्ते वीणापूजन होऊन कार्यक्रमास सुरुवात होईल. दररोज पहाटे काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, गीता अध्याय, गाथा भजन तसेच दुपारी १ ते ५ या वेळेत ह. भ. प. मंगेश महाराज दाताळकर यांच्या रसाळ वाणीतून श्री शिवमहापुराण कथा संपन्न होणार आहे. रात्री नामजप, हरिपाठ व नामवंत कीर्तनकारांची हरिकीर्तने होणार आहेत.

दि. ६ जानेवारी रोजी ह. भ. प. भगवान महाराज मते, दि. ७ रोजी ह. भ. प. माऊली महाराज कराळे, दि. ८ रोजी ह. भ. प. लक्ष्मण कराड महाराज, दि. ९ रोजी ह. भ. प. उमेश महाराज दशरथे, दि. १० रोजी ह. भ. प. विशाल महाराज खोले, दि. ११ रोजी युवा कीर्तनकार ह. भ. प. सोपान महाराज कनेरकर, तर दि. १२ रोजी ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांची हरिकीर्तने होणार आहेत. दि. १३ जानेवारी रोजी सकाळी काल्याचे कीर्तन, स्वामींच्या प्रतिमेची मिरवणूक व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होईल.

या पुण्यतिथी सोहळ्यास महाराष्ट्रातील अनेक संत, महंत व विविध क्षेत्रांतील मान्यवर



उपस्थित राहणार असून, सर्व भाविकांनी उपस्थित राहून शिवमहापुराण कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवळाली ग्रामस्थांनी केले आहे.

# घनसावंगी तहसील कार्यालयासमोर मृत्यूचा सापळा

## रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यामुळे भीषण अपघात; तरुण गंभीर जखमी

घनसावंगी /प्रतिनिधी

घनसावंगी तहसील कार्यालयासमोरच्या मुख्य रस्त्यावर पडलेल्या मोठ्या व खोल खड्ड्याने अखेर आपला बळी घेतला आहे.दि.५ जानेवारी २०२६, सोमवार रोजी दुपारी घडलेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार तरुण गंभीर जखमी झाला असून या घटनेमुळे संपूर्ण शहरात प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास दोन तरुण दुचाकीवरून कामावर जात असताना तहसील कार्यालयाच्या अगदी समोरच रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या मोठ्या खड्ड्याचा अंदाज न आल्याने दुचाकी थेट खड्ड्यात आदळली. जोरदार धडकेत दोघेही रस्त्यावर फेकले गेले. या अपघातात एका तरुणाच्या डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत.प्रशासनाचे



बेजबाबदारपण उघड

सदर मुख्य रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे.तहसील कार्यालय,न्यायालयीन कामकाज,विविध शासकीय कार्यालये असल्याने या रस्त्यावरून दररोज हजारो नागरिकांची व वाहनांची वर्दळ असते. मात्र याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही नगर पंचायत प्रशासन व मुख्याधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे.

मोठ्या अपघाताची वाट पाहत होते का ? अपघातानंतर संतप्त नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.

# आष्टी मतदार संघातील बंधारे, रस्ते व पाझर तलाव दुरुस्ती करा

## अन्यथा गुरुवारी तहसीलसमोर धरणे आंदोलन - मा. आ. भीमराव धोंडे

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी विधानसभा मतदार संघात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे बंधारे, नदीवरील पूल, रस्ते, पाझर तलावांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अद्यापही त्यांच्या दुरुस्तीची कामे सुरू झालेली नाहीत. या पार्श्वभूमीवर माजी आ. भीमराव धोंडे यांनी तहसीलदार आष्टी यांना पत्र देऊन ही कामे तातडीने दुरुस्त करावेत अन्यथा गुरुवार दि. ८ जानेवारी रोजी आष्टी तहसील कार्यालयासमोर या मागणीसाठी बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा माजी आ. भीमराव धोंडे यांनी दिला आहे.

आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) या तीनही तालुक्यांत अतिवृष्टीमुळे अनेक बंधारे व पाझर तलाव उद्ध्वस्त झाले आहेत. याचा थेट परिणाम परिसरातील शेती व पाणी साठवण क्षमतेवर होत असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत



आहे. मात्र या गंभीर विषयाकडे संबंधित प्रशासन व जलसंधारण विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप माजी आ. धोंडे यांनी केला आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या जलसिंचन व पाझर तलाव दुरुस्तीच्या कामांनाही अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. प्रशासनाच्या दिरंगाई विरोधात संताप व्यक्त होत आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने लक्ष घालून पुढील दोन दिवसांत बंधारे, रस्ते, पाझर तलाव व जलसिंचन विहिरींची दुरुस्तीची कामे सुरू करावीत, अशी मागणी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे.

जर ठरलेल्या मुदतीत कामांना सुरुवात झाली नाही तर गुरुवार दि. ८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा. आष्टी तहसील कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी पाटोदा, पोलीस अधीक्षक बीड व पोलीस निरीक्षक आष्टी यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# मुलांसाठी योग-ध्यान व हनुमान चालीसा उपक्रमाला उत्साहात सुरुवात

## हंस फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम संस्कार,आरोग्य व सकारात्मकतेचा संदेश

अंबड /प्रतिनिधी

नवीन वर्षाची सुरुवात संस्कार आरोग्य व सकारात्मक विचारांनी व्हावी या उद्देशाने घुंगर्डे हादगाव येथे हंस फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या मुलांसाठीच्या योग-ध्यान व हनुमान चालीसा उपक्रमाला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली.या उपक्रमाअंतर्गत येथील हनुमान मंदिरात लहान मुलांसाठी सामूहिक हनुमान चालीसा पठण सोपे प्राणायाम योगासने तसेच ध्यान मेडिटेशन घेण्यात आले.कार्यक्रमात मोठ्या संख्येने लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शिस्तबद्ध व भक्तीमय वातावरण निर्माण केले.या उपक्रमामुळे मुलांमध्ये शिस्त एकाग्रता मनःशांती तसेच सुदृढ आरोग्याच्या सवयी विकसित होण्यास निश्चितच मदत होईल असे मत उपस्थित पालकांनी व्यक्त केले.सहभागी झालेल्या सर्व मुलांना हंस फाउंडेशनतर्फे हनुमान चालीसा पुस्तिका भेटस्वरूपात देण्यात आली.यावेळी ह.भ.प. प्रभातसिंग परिहार महाराज यांनी मुलांना हनुमान चालीसेचे महत्त्व त्यातून मिळणारी मानसिक शक्ती व सकारात्मक



ऊर्जा याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील पालकवर्ग जागृत नागरिक तसेच भागवत परिवाराने मोलाचे सहकार्य केले.

या कार्यक्रमास हंस फाउंडेशनचे प्रतिनिधी माऊली दोबोले, शिवाजी बाम्हणे, योगेश हेंद्रे, तसेच गावातील तरुण गोविंद कोळेकर,गजानन पवार, बाबासाहेब कोळेकर व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.दर शनिवारी नियमित उपक्रम याच उपक्रमाचा भाग म्हणून प्रत्येक शनिवारी सायंकाळी ७ वाजता हनुमान मंदिरात सर्व मुलांसाठी सामूहिक हनुमान चालीसा पठण योग व ध्यान कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहे.

तरी सर्व पालकांनी आपल्या मुलांना वेळेवर मंदिरात पाठवून या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# बालझुंबड - पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धेत विद्यार्थ्यांचे दमदार सादरीकरण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग २६ व्या बालझुंबड मधील पीपीटी (पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन) स्पर्धा सोमवार, दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. संयोजक तथा मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित पीपीटी (पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन) स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध २६ विषयांवर आपले सादरीकरण दमदार पद्धतीने केले. ही स्पर्धा ५० गुणांची होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब कांबळे (सृजन प्राथमिक विद्यालय, चनई) हे तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार प्रशांत लाटकर, नगरसेवक सौ.रेखा विलासराव जाधव, प्राचार्य प्रशांत कुमार (न्यु व्हिजन



पब्लिक स्कूल, अंबाजोगाई) आणि परिक्षक म्हणून मनोज कराड (खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई), आर्या गलनकर, शेख शाहेबाज, श्री.क्षीरसागर सर आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुज्य सानेगुरूजी यांच्या प्रतिमेचे पुजन, दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मान्यवरांचा सत्कार संयोजक समितीच्या वतीने करण्यात आला. यावेळी बोलताना प्रमुख अतिथी पत्रकार प्रशांत लाटकर म्हणाले की, बालझुंबड मधून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन मिळते. बालझुंबड स्पर्धेच्या आयोजनाबद्दल संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी, कार्यकारी संचालक संकेत मोदी यांचे कौतुक केले. व विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करणे व जास्तीत जास्त संख्येने स्पर्धेत सहभागी होवून पीपीटी स्पर्धेत चांगल्या पद्धतीने सादरीकरण करावे असे आवाहन लाटकर यांनी विद्यार्थ्यांना केले. अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक बाळासाहेब कांबळे म्हणाले की, मागील २५ वर्षांपासून अव्याहतपणे सुरू असलेल्या बालझुंबडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे, प्रगतीसाठी हा उपक्रम खूप महत्त्वाचा आहे. पीपीटी सारख्या स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, देहबोली, क्रियाशीलता, संवाद, कल्पनाशक्ती, लेखन कौशल्य यांचा विकास होतो.

# ग्रामीण भागातील शिक्षणाची गंगोत्री : माजी आमदार धोंडीरामजी राठोड (भाऊ) - एक जिवंत विद्यातीर्थ

डॉ आशिष तिवारी/मंठा

मंठा-परतूर परिसराच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक इतिहासात माजी आमदार आदरणीय धोंडीरामजी राठोड (भाऊ) यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर ते जीवन बदलण्याचे प्रभावी साधन आहे, ही संकल्पना त्यांनी आपल्या कार्यातून प्रत्यक्षात उतरवली. खऱ्या अर्थाने शिक्षणाची गंगोत्री ग्रामीण भागात आणण्याचे महत्कार्य त्यांनी आयुष्यभर निष्ठेने केले.

ज्या घरांमध्ये कधीकाळी डोक्यावर ओझ्याची पाटी होती, त्या घरातील हातात 'क-ख-ग-घ'ची पाटी देऊन दारिद्र्याच्या डोहातून बाहेर काढत वातानुकूलित आयुष्याकडे नेणारा शिक्षणाचा मार्ग भाऊंनी हजारो कुटुंबांसाठी खुला केला. शिक्षणाच्या प्रकाशाने अंधारलेल्या घरांमध्ये देदीप्यमान दिवा लावून पिढ्यान्पिढ्या उत्कर्ष, प्रगती आणि विकासाची वाटचाल घडवून आणणारे असे नेतृत्व विरळाच.

मंठा-परतूर परिसरात शैक्षणिक संस्था उभारणी, विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधा, शिक्षकांना बळ देणे आणि ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे, या प्रत्येक टप्प्यावर धोंडीरामजी राठोड यांनी आपले संपूर्ण आयुष्य झोकून दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज या भागातील असंख्य विद्यार्थी अधिकारी, डॉक्टर, अभियंते, शिक्षक आणि उद्योजक म्हणून समाजात मानाने उभे आहेत.



राजकारणात असूनही शिक्षणाला त्यांनी कधीच दुय्यम स्थान दिले नाही. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे खरे शस्त्र आहे, या ठाम विश्वासातून त्यांनी निर्णय घेतले. म्हणूनच ते केवळ माजी आमदार म्हणून नव्हे, तर 'शिक्षणाचे आराध्य दैवत' म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याचा ठसा इतका खोल आहे की तो आजही परिसराच्या प्रत्येक शाळेत, महाविद्यालयात आणि विद्यार्थ्यांच्या यशात दिसून येतो.

असे न भुतो न भविष्यती लोकनेते आपल्या परिसरात लाभणे हे खरेच आपले आहोभाग्य आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण मंठा-परतूर परिसरातून शुभेच्छांचा वर्षाव होत असून, आई जगदंबा चरणी प्रार्थना आहे की आदरणीय धोंडीरामभाऊ राठोड यांना उत्तम आरोग्यसह उदंड आयुष्य लाभो आणि त्यांचे प्रेरणादायी कार्य पुढील अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरो.भाऊंना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

# ह.भ.प.प्रा.विजय राजपुरे यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

आष्टी - (प्रतिनिधी) धनगरवाडी (डो.), ता. आष्टी येथील ग्रामीण भागातील होतकरू तरुण, शिक्षण आणि अध्यात्म या दोन्ही क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ह. भ. प. प्रा. विजय दत्तु राजपुरे यांना गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. लहानपणापासून संघर्षमय जीवन जगत विजय राजपुरे यांनी शेती, ऊस तोडणी, ट्रॅक्टर चालवणे अशी कष्टाची कामे करत शिक्षणाची आवड जपली. रांजणगाव येथील महागणपती करिअर फाउंडेशन येथे त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली. समाजासाठी काहीतरी करण्याच्या जिद्दीने त्यांनी आष्टी येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कोचिंग क्लास सुरू केला.



गरिबीची जाणीव ठेवून अनाथ व दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, तसेच गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक सहकार्याची भूमिका त्यांनी सातत्याने निभावली आहे.सुदर्शन आश्रम, शिंदेवाडी येथील महंत गुरुवर्य सुदर्शन मुनी महाराज उदासीन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून अध्यात्मिक कार्यालाही सुरुवात केली. समाजातील दुःखी, गरजू व उपेक्षित घटकांबद्दल असलेली त्यांची तळमळ आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन त्यांना गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे डिसेंबर २०२५ या एका महिन्यात विजय राजपुरे यांना लोकशक्ती समाजभूषण राज्यस्तरीय पुरस्कार आणि गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार असे दोन मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल राजपुरे सरांचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# सत्यशोधक समाज संघाच्या राज्यव्यापी अधिवेशनात बालकीर्तनकार वेदिका दीदींचे प्रभावी प्रबोधन

डॉ आशिष तिवारी/मंठा -

येथील संत एकनाथ महाराज नाट्यमंदिरात आज सत्यशोधक समाज संघाच्या वतीने आयोजित ४३ व्या राज्यव्यापी अधिवेशनात ह.भ.प. बालकीर्तनकार वेदिका दीदी ज्ञानेश्वर जाधव (माळकीनिकर) यांना विशेष प्रबोधनासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

अधिवेशनात वेदिका दीदींनी समाजप्रबोधन, समता, विवेकवाद व सामाजिक जागृती या विषयांवर अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी शैलीत विचार मांडले. त्यांच्या ओघवत्या वाणीतून साकारलेल्या प्रबोधनाने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले असून सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.वेदिका दीदींच्या उत्कृष्ट प्रबोधनाची दखल घेत सत्यशोधक समाजाचे अभ्यासक व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. आर. एस. यादव तसेच ह.भ.प. धर्मकीर्ती महाराज यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी वेदिका दीदींच्या वडिलांचाही त्यांच्या सोबत सत्कार करण्यात आला.

अत्यल्प वयात समाजप्रबोधनाचे भान ठेवून




विचारमंथन करणाऱ्या वेदिका दीदींचे कार्य भविष्यात समाजासाठी दिशादर्शक ठरेल, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. राज्यभरातून आलेल्या प्रतिनिधी, अभ्यासक व कार्यकर्त्यांनी वेदिका दीदींच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले.सत्यशोधक समाजाच्या विचारांचा वारसा पुढील पिढीकडे नेण्याचे कार्य अशा बालकीर्तनकारांच्या माध्यमातून घडत असल्याचा समाधानकारक सूर अधिवेशनात उमटत होता.

# घनसावंगी सामाजिक वनीकरण विभागात वनरक्षकाची मुजोरी; पैशांसाठी शेतकऱ्यांची अडवणूक

## वनरक्षक विलास घुसिंगे यांच्या विरोधात माजी सरपंचाची तक्रार;आंदोलनाचा दिला इशारा

**घनसावंगी /प्रतिनिधी एकीकडे शासन वृक्ष लागवड योजनेच्या माध्यमातून हरित महाराष्ट्राचे स्वप्न पाहत असताना, दुसरीकडे घनसावंगी तालुक्यातील सामाजिक वनीकरण विभागाचे काही कर्मचारी या योजनेला हरताळ फासत असल्याचे समोर आले आहे.शेतकऱ्यांच्या बांधावर वृक्ष लागवड योजनेअंतर्गत ई-मस्टरची इ.एम.बी (एचइ) करण्यासाठी वनरक्षक विलास घुसिंगे हे जाणीवपूर्वक टाळाटाळ करून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करत असल्याचा गंभीर आरोप बोरगाव खुर्दचे माजी सरपंच निळकंठ भानुसे यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी आपल्या बांधावर वृक्ष लागवड केली आहे, ज्याचे मोजमाप करून पुढील प्रक्रिया करणे वनरक्षकाचे कर्तव्य आहे.मात्र वनरक्षक घुसिंगे हे शेतकऱ्यांची कामे वेळेवर न करता त्यांची अडवणूक करत आहेत. विशेष म्हणजे कार्यालयात उपस्थित न राहता केवळ एजंट धार्जिणी भूमिका घेत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.**

तक्रारीतील खळबळजनक आरोप माजी सरपंच निळकंठ भानुसे यांनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याकडे दिलेल्या लेखी तक्रारीत धक्कादायक बाबी नमूद केल्या आहेत

कार्यालयात दांडी घुसिंगे हे घनसावंगी येथील कार्यालयात कधीही वेळेवर बसत नाहीत.

फोनला केराची टोपली हतबल शेतकरी फोन करत असताना त्यांचे फोन उचलले जात नाहीत किंवा त्यांना भेट दिली जात नाही.मध्यस्थांचा सुळसुळाट सामान्य शेतकऱ्याची अडवणूक करायची आणि केवळ पैसे देणाऱ्या एजंट नाच भेटायचे असा शिरस्ता त्यांनी लावला आहे.संशयास्पद हालचाली रात्री-बेरात्री सूतगिरणी परिसरात थांबून नियमबाह्य कामे करण्यावर त्यांचा भर असतो असेही तक्रारीत म्हटले आहे.

शासकीय पगार घेऊन शेतकऱ्यांची सेवा करण्याऐवजी घुसिंगे हे खाजगी एजंटप्रमाणे वागत आहेत.अशा भ्रष्ट आणि कामचुकार कर्मचाऱ्याची तातडीने बदली करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा आम्हाला लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करावे लागेल.निळकंठ भानुसे,माजी सरपंच,बोरगाव खुर्द.

आंदोलनाचा इशारा

या तक्रारीमुळे वनविभागात मोठी खळबळ उडाली असून वरिष्ठ अधिकारी यावर काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.जर विलास घुसिंगे यांच्यावर तातडीने कारवाई झाली नाही तर शेतकऱ्यांच्या हितासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा भानुसे यांनी दिला आहे.

# आष्टीत दि. ११ ते १७ जानेवारी २०२६ दरम्यान भव्य संगीत श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहा

## आ.सुरेश धस यांचे भाविकांना कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

भक्ती-संस्कार-अध्यात्माचा संगम अनुभवण्याची संधी

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्याच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनात एक ऐतिहासिक पर्व ठरणाऱ्या भव्य संगीत श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन आ. सुरेश धस प्रतिष्ठान यांच्या वतीने करण्यात आले आहे. दिनांक ११ जानेवारी ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत हा सात दिवसांचा भव्य सोहळा आष्टी येथे संपन्न होणार असून, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून हा उपक्रम साकारत आहे. या सोहळ्याच्या माध्यमातून प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन, त्यांचे चरित्र, मूल्ये व संस्कार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे.

या श्रीराम कथेचे रसाळ, अभ्यासपूर्ण व भावस्पर्शी निरूपण देवदास स्वामी मठ, दादेगाव येथील परमपूजनीय महंत मंदार महाराज रामदासी करणार आहेत. त्यांच्या ओघवत्या वाणीमुळे आणि संगीताच्या साथीतून सादर होणाऱ्या कथेने भाविकांना अध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळणार आहे. हा संपूर्ण सोहळा आष्टी येथील पंचायत समिती कार्यालयाच्या प्रशस्त प्रांगणात आयोजित करण्यात आला असून, भाविकांसाठी आवश्यक त्या सर्व सोयी - सुविधांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

दिनांक ११ ते १७ जानेवारी या कालावधीत



दररोज दुपारी १२.३० ते सायंकाळी ४.०० या वेळेत श्रीराम कथा होणार आहे. विशेष म्हणजे मकर संक्रांतीच्या पावन पर्वावर, दिनांक १४ जानेवारी रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत विशेष श्रीराम कथा आयोजित करण्यात आली असून, त्या दिवशी भाविकांची विशेष गर्दी होण्याची शक्यता आहे. या दिवशी प्रभू श्रीरामांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांवर विशेष प्रकाश टाकण्यात येणार आहे. या भव्य ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या प्रारंभाच्या पूर्वसंध्येला संपूर्ण आष्टी शहरातून भव्य व आकर्षक शोभायात्रा काढण्यात येणार आहे. ढोल - ताशांच्या गजरात, भगव्या पताका, फुलांची सजावट आणि प्रभू श्रीरामांच्या जयघोषात निघणारी ही शोभायात्रा शहरातील धार्मिक वातावरण अधिक भक्तिमय करणार आहे. शोभायात्रेमुळे नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होणार असून, लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे.

या सात दिवसांच्या सोहळ्यात दररोज प्रभू श्रीरामांची आरती, संत पूजन तसेच भाविकांसाठी प्रसाद वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून भक्तीबरोबरच सामाजिक सलोखा, सद्भावना आणि एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न आयोजकांकडून केला जात आहे. श्रीरामांच्या आदर्श विचारांतून समाजात सदाचार, नीतिमत्ता व संस्कार रुजावेत, हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले. या श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यामुळे आष्टी शहरासह परिसरातील २० ते २५ गावांमधील हजारो भाविक सहभागी होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामीण व शहरी भागातील भाविकांना एकत्र आणणारा हा सोहळा धार्मिकतेबरोबरच सांस्कृतिक एकोप्याचे प्रतीक ठरणार आहे.

याबाबत आ. सुरेश धस यांनी सांगितले की, प्रभू श्रीरामांचे जीवन हे प्रत्येकासाठी आदर्श आहे. त्यांच्या विचारांतून समाजाला योग्य दिशा मिळते. हा श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळा प्रत्येक रामभक्तासाठी एक आध्यात्मिक पर्वणी आहे. सर्व भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या पवित्र कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. आष्टीत आयोजित करण्यात आलेला हा भव्य संगीत श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळा भक्ती, श्रद्धा, संस्कार आणि अध्यात्माचा संगम ठरणार असून, भाविकांच्या मनात प्रभू श्रीरामांविषयीची भक्ती अधिक दृढ करणारा ठरेल, असे चित्र सध्या दिसून येत आहे.




आष्टी - आष्टी शहरातील क्रांतीसूर्य महात्मा फुले चौकामध्ये ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना आ. सुरेश धस, अजित मुळे, पवन विधाते, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, नगरसेवक अक्षय धोंडे, आदेश निमोणकर दिसत आहेत.

# पै.मा.श्री.सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ७२ रक्तदात्यांचे रक्तदान

## नेते-कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग

आष्टी - (प्रतिनिधी) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य पै. मा. श्री. सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली, तर स्वतः पै. मा. श्री. सतीश आबा शिंदे यांच्यासह अनेक नेत्यांनी रक्तदान करून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले.

रक्तदान करून चालणार नाही, ते गरजूंपर्यंत योग्य वेळी पोहोचले पाहिजे या उद्देशाने दरवर्षी हा उपक्रम राबवण्यात येतो. याही वर्षी श्यामभाऊ माने मित्रपरिवार, आष्टी तालुका यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून खऱ्या गरजू रुग्णांना वेळेवर रक्त मिळून त्यांचे प्राण वाचावेत, हाच या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले. या शिबिरात पै. मा. श्री. सतीश आबा शिंदे यांनी स्वतः रक्तदान करून रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे. प्रत्येकाने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करावे, असे आवाहन केले.

या प्रसंगी बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अण्णासाहेब चौधरी, शिवाजीआबा डोके, उपमहाराष्ट्र केसरी अक्षय शिंदे, सुनील दादा नाथ, विजय अण्णा गाढवे, असलम शेख, महादेव डोके, शिवाजी शेकडे, सरपंच बाळासाहेब गर्जे, राहुल काकडे, भाऊ घुले, रिजवान शेख, पत्रकार सचिन पवार, दिगंबर पोकळे, अर्जुन आबा पवार, सुग्रीव पवार, सागर खेंगट, बाळासाहेब मोरे, इरफान शेख, देवा मुटकुळे, जालिंदर नाना गायकवाड, रमेश दादा भोगाडे, योगेश मुटकुळे, अमोल दरेकर, हनुमंत झगडे, बंडू पवार, अमोल थेटे,



विठ्ठल चखाले, श्याम माने, प्रवीण श्रीखंडे, शितू मुटकुळे, अनिल तावरे, गहीनाथ गाडे, चंदू सपकाळ, पंडित पोकळे, संतोष गोयकर, आबासाहेब तांबे, अशोक आवारे, शरद वाळेकर, सदाभाऊ बन, महादेव घुले, बाबू शिंदे, निखिल नरोडे, कुमार धनवडे, अंगदबीचे विकी हंबर्डे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान श्रेष्ठ दान - पै. मा. श्री. सतीश आबा शिंदे

वाढदिवसानिमित्त दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केले जाते. या उपक्रमातून अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचले आहेत. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी माझ्या सर्व मित्रपरिवाराचे मनःपूर्वक आभार. भविष्यातही जिथे गरज असेल तिथे रक्त उपलब्ध करून देण्यासाठी आमची टीम प्रयत्नशील राहील, असे पै. मा. श्री. सतीश आबा शिंदे यांनी सांगितले.

# सागर धस यांच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ; सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांनाही लावली उपस्थिती

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा मतदारसंघातील विविध विकासकामे आणि सामाजिक उपक्रमांना गती देण्यासाठी सागर धस सध्या सक्रीय झाले आहेत. आज त्यांनी मतदारसंघातील डोमरी, दीनदयाळ नवरचना प्रतिष्ठान आणि श्रृंगेरी देवी यात्रा या ठिकाणी भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला व विविध कार्यक्रमांना उपस्थिती दर्शवली.

अंगणवाडी इमारतीचे भूमिपूजन

डोमरी येथील कोल्हे-माने-डिसले वस्ती येथे ग्रामस्थांच्या मागणीनुसार मंजूर करण्यात आलेल्या नवीन अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ सागर धस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील बालकांना दर्जेदार आणि सुरक्षित शिक्षण मिळणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. या नवीन सुसज्ज इमारतीमुळे परिसरातील लहान मुलांच्या शिक्षणाची मोठी सोय होणार आहे.

शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे कौतुक

त्यानंतर, सागर धस यांनी दीनदयाळ नवरचना प्रतिष्ठान संचलित ४० व्या वार्षिक पालक मेळाव्यास उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद



साधला. संस्थेच्या ४० वर्षांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांनी भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत अशा संस्थांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

# शिवसेना राष्ट्रवादी प्रचार शुभारंभ प्रसंगी

## सिडको हडको परिसराच्या विकासासाठी कटिबद्ध शिवसेना उपनेते आ हेमंत पाटील



नांदेड :- शिवसेना राष्ट्रवादी प्रभाग क्र २० मधील उमेदवाराच्या प्रचारार्थ हाडको

ईच्छापुर्ती हनुमान मंदीर येथे प्रचाराचा नारळ शिवसेना उपनेते आ हेमंत पाटील .राष्ट्रवादी नेते माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर . आ आनंदराव बोंढारकर . आ बाबुराव कोहळीकर . माजी आ ओमप्रकाश पोकर्णा . मोहन हंबर्डे . सुभाष साबणे . राष्ट्रवादी चे नेते प्रविव पाटील चिखलीकर लोहा नगर परिषदेचे लोकनियुक्ती नगर अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते नारळ फोडून प्रचाराचे शुभारंभ करण्यात आले असून यावेळी आ हेमंत पाटील यांनी आपल्या मनोगत पर भाषणात संबोधीत करताना म्हणाले की राज्यात आमची सत्ता असून नगरविकास खात्याचे मंत्री आमचे नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे हे असून नगरविकास खाते आमच्या कडे असल्यामुळे येत्या निवडणुकीत आमच्या उमेदवारांना भरघोष मतांनी निवडून द्या सिडको हाडको परिसराच्या विकासा साठी आम्ही कटिबद्ध आहोत असे संबोधीत केले तर यावेळी त्यांच्या सह इतर मान्यवरांची भाषणे झाली असून . नांदेड वाघाळा महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत शिवसेना राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट यांच्या वतीने प्रभाग क्र २० च्या ५ उमेदवारा साठी हाडको परिसरातील ईच्छापुर्ती हनुमान मंदीर येथे प्रमुख मान्यवर वरील पदअधिकारी यांच्या हस्ते नारळ फोडून प्रचारास सुरुवात करण्यात आला आहे निवडणुक प्रचार शुभारंभ करण्यात आला या वेळी शिवसेना पक्षाच्या वतीने प्रभाग क्र २० मधील सर्वसाधरण पुरुष मध्ये विनय पाटील गीरडे तर सर्वसाधारण महिला सौ रेखाताई विनायक आकुरके . ओबीसी पुरुष संतोष माधवराव कांचनगीरे .ओबीसी महिला सौ योगीता अमोल येरगेवार . राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या एस सि महिला सौ संघमित्रा दिलीप कांबळे यांच्या प्रचारार्थ नेते मंडळीनी सर्व उमेदवारांना भरघोष मतांनी निवडून देण्याचे आवाहन या कार्यक्रमा प्रसंगी करण्यात आले तर या कार्यक्रमास परिसरातील नागरीकांसह मोठ्या प्रमाणात शेकडो महिला लाडक्या बहिणीला व शेकडो पुरुषांना केला असून या वेळी परिसरातील राष्ट्रवादी व शिवसेना पक्षाचे पद अधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती .

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेखाताई बनसोडे यांना संघर्ष नायिका पुरस्कार जाहीर



नायगाव प्रतिनिधी

अपेक्षित समाजाच्या न्याय हक्कासाठी व त्यांच्या सर्वांगीण परिवर्तनासाठी गेल्या अनेक वर्षापासून संघर्ष करणाऱ्या आणि सामाजिक कार्यात आपली एक वेगळी छाप निर्माण केलेल्या मौजे शेळगाव छत्री येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती रेखाताई बनसोडे देवकर यांना सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने संघर्ष नायीका पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

राष्ट्र महापुरुष यांनी समाजाच्या उत्थानासाठी आयुष्यभर संघर्ष केला त्यांच्या प्रगल्भ विचारांना संघर्षमय त्यागाना अधिष्ठान मानुन त्या दिशेने सातत्याने आपले सामाजिक काम गेल्या अनेक वर्षापासून अविरतपणे करणाऱ्या श्रीमती रेखाताई बनसोडे यांना अनाथाची आई म्हणून ओळखले जाते या व्यतिरिक्त गरजू गरीब लोकांना आपल्या परीने त्यांनी आजवर मदत करीत आलेल्या रेखाताई बनसोडे यांच्या संघर्षमय त्यागाची दखल घेऊन सत्यशोधक डॉक्टर अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स या सामाजिक संघटनेने संघर्ष नायीका या पुरस्काराची घोषणा केली असून ३१ जानेवारी रोजी ज्ञानमाता सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सिडको नांदेड येथे निमंत्रित असलेल्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आणि सुजाता पोहरे शेख शकीला सदर संघटनेचे प्रमुख बा रा वाघमारे यांच्या उपस्थितीमध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेखाताई बनसोडे देवकर यांना संघर्ष नायीका या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे अशी माहिती सदर संघटने कडून देण्यात आली असून रेखाताई यांना जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# आज अंगारकी चतुर्थी निमित्त श्रीसत्य गणपतीचे लाखो भाविक दर्शनाला येणार

## तहसील प्रशासनाच्या वतीने जय्यत तयारी सुरु मंदिराचा संपूर्ण परिसर सि.सि.टिव्ही कॅमेऱ्याच्या नजरेत

अर्धापूर (प्रतिनिधी): - मराठवाड्यातील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या नांदेड - नागपूर रस्त्यावरील अर्धापूर तालुक्यातील दाभड परिसरातील श्रीसत्य गणपती संस्थांच्या वतीने दि.६ मंगळवारी रोजी अंगारिका संकष्ट चतुर्थीती परिसरात जय्यत तयारी केली आहे. महसूल व पोलीस प्रशासन गणेश भक्तांना दर्शन सुलभ होण्यासाठी विशेष व्यवस्था केली आहे.

नांदेड - अर्धापूर रस्त्यावरील दाभड (भोकरफाटा) परिसरातील श्रीसत्य गणपती देवस्थान एक जागृत देवस्थान म्हणून मराठवाड्यात प्रसिद्ध आहे. श्रीसत्य गणपतीचे दर्शन घेण्यासाठी दर महिन्याच्या संकष्ट चतुर्थीला गणेश भक्तांची खूप मोठी गर्दी होत असते. अंगारिका चतुर्थिचा योग वर्षातून एकदाच येत असल्याने भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. तहसीलदार तथा प्रशासक रेणुकादास देवनीकर,नायब तहसीलदार संजय शिंदे

देवस्थान कर्मचारी व महसूल व पोलीस प्रशासन विशेष व्यवस्था करीत आहे.पार्किंगसाठी व्यवस्था,सावलीसाठी मंडप,दर्शनी रांगा,दर्शनी मार्ग केला असुन विशेष सर्वांना एकाच रांगेत दर्शन घ्यावे लागणार आहे श्रीगणेश भक्तांना मंदिराच्या कमानी पासून दर्शनाला रांगेत जावे लागणार आहे दर्शन रांगेच्या दोन्ही बाजूने संरक्षक कठडे लावण्यात येणार आले आहेत दर्शन झाल्यावर भक्तांनी शांततेत बाहेर पडून सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



# कंधार व लोहा तालुक्यातील ९ तांड्यांना महसुली दर्जामिळाला - भगवान राठोड

कंधार (प्रतिनिधी)

राज्यशासनाने डोंगर कपारीत असलेल्या कंधार व लोहा तालुक्यातील ९ तांड्यांना महसुली दर्जा मिळवून दिल्याची माहिती संत सेवालाल महाराज बंजारा लमान तांडा समृद्धी योजनेचे जिल्हा स्तरीय समितीचे अशासकीय सदस्य भगवान राठोड यांनी दिली.तांड्यांना विकासाच्या वाटेवर आणण्यासाठी राज्यशासनाने संत सेवालाल महाराज बंजारा लमान तांडा समृद्धी योजना राज्यभरात सुरू केली. नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या तांड्याना महसूली दर्जा व ग्रामपंचायतचा दर्जा देण्यात यावा, यासाठी अनेक वर्षापासून मागणी केली जात होती. गाव अंतर्गत येणाऱ्या तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्याने तांडे विकासापासून दूर राहत असल्याची भावना समाज बांधवांमध्ये होती.



ग्रामपंचायत अंतर्गत वेगवेगळे विकास कामे राबवून गावाचा विकास केला जातो परंतु जिल्ह्यातील अनेक तांड्यामध्ये ग्रामपंचायत नसल्याकारणाने तांड्याचा अपेक्षित विकास साधायला अडचणी येत होत्या. या अडचणी मार्गी लावण्यासाठी राज्यशासनाने संत सेवालाल महाराज बंजारा लमानतांडा समृद्धी योजना सुरू केली. या योजनेचा फायदा बंजारा समाजाला होत असून कंधार व लोहा तालुक्यात नवीन ९ ग्रामपंचायती उदयास आल्या आहेत.

३१ डिसेंबर २०२५ रोजी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशात कंधार तालुक्यातील नागलगाव ग्रामपंचायतचे विभाजन करून दुर्गातांडा व उदातांडा, शिराढोण ग्रामपंचायतचे विभाजन करून नाईकनगर तर लोहा तालुक्यातील उमरा ग्रामपंचायतचे विभाजन करून धनाजीतांडा, परसरामतांडा, रूपशिंगतांडा, फुलमळातांडा, गोविंदतांडा, आणि लिंबोटी ग्रामपंचायतचे विभाजन करून येलदरी तांडा अशा एकूण ९ तांड्याना महसुली दर्जा प्राप्त होऊन, स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे शासनाचे आदेश प्राप्त झाल्याची माहितीही राठोड यांनी दिली.

# किनवट शहरातील मुक्या प्राण्यांचा आधारस्तंभ : गोवर्धन तक्कलवार यांचे प्रेरणादायी प्राणीप्रेम



किनवट /प्रतिनिधी

किनवट शहरातील गोवर्धन तक्कलवार हे मक्तेदारीने शेती करणारे एक सर्वसामान्य व्यक्तिमत्त्व; मात्र त्यांच्या असामान्य प्राणीप्रेमामुळे आज ते संपूर्ण शहरात परिचित झाले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते शहरातील मोकाट कुत्र्यांना दररोज नित्यनियमाने खाऊ घालण्याचे कार्य अव्याहतपणे करत आहेत.

सुरुवातीला रस्त्यावर भटकणाऱ्या कुत्र्यांची दयनीय अवस्था पाहून त्यांच्या मनात करुणा निर्माण झाली. त्या काळात ते मोठ्या प्रमाणात पार्ले-जी बिस्किटे आणून संध्याकाळच्या वेळी कुत्र्यांना खाऊ घालत असत. काही दिवसांतच मुक्या प्राण्यांना याची सवय लागली आणि संध्याकाळच्या वेळी ठरावीक ठिकाणी कुत्री एकत्र येऊ लागली. हे दृश्य पाहून गोवर्धन तक्कलवार यांचे प्राणीप्रेम अधिक दृढ होत गेले.

काळानुसार त्यांनी या उपक्रमाला अधिक व्यापक व पोषणमूल्य असलेले स्वरूप दिले. आज ते दररोज सकाळी घरातूनच भात, मटकी, चना आदी जे शक्य होईल ते अन्न स्वतः तयार करतात. एका सहाय्यकाला सोबत घेऊन मोटरसायकलवरून शहरातील विविध भागांत फिरत, जिथे कुत्रे दिसतील तिथे जाऊन ते त्यांना प्रेमाने अन्न खाऊ घालतात. पाऊस असो वा उन्हाची तीव्रता, कोणताही दिवस ते चुकवत नाहीत-ही बाब त्यांच्या सेवाभावाची साक्ष देते.

प्राणी सेवा हीच ईश्वर सेवा हेच त्यांचे ब्रीद असून, मुक्या प्राण्यांप्रती असलेली ही तळमळ कुठल्याही प्रसिद्धीच्या अपेक्षेविना ते जपतात. त्यांच्या या नि:स्वार्थ कार्यामुळे शहरातील नागरिक अचंबित झाले असून, अनेक जण त्यांच्या सेवाभावाचे कौतुक करत आहेत. काही तरुणांना आणि नागरिकांना त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळत असून, प्राणीप्रेम व संवेदनशीलतेचा संदेश समाजात पोहोचत आहे.

किनवट शहरातील मुक्या प्राण्यांसाठी गोवर्धन तक्कलवार हे जणू देवदूत ठरले आहेत. त्यांच्या या निस्वार्थ सेवेमुळे माणुसकी, करुणा आणि सामाजिक जबाबदारी यांचे सुंदर दर्शन घडते. अशी व्यक्तिमत्त्वे समाजाला दिशा देणारी ठरतात, हे नक्की.

# कोलंबी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान


नायगाव ।प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील कोलंबी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या योजनेअंतर्गत गावामध्ये विविध विकास कामे करण्यात आली. यावेळी कोलंबी गावामध्ये स्वच्छता अभियान तसेच नालिसफाई, वृक्षलागवड, ग्रामपंचायत डिजिटल करणे, आपले सरकार सेवा केंद्र अद्यावत करणे, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे सौचालय दुरुस्ती, वृक्ष लागवड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, किचनशेड, परसबाग तसेच स्मशानभूमी येथे वृक्षलागवड, पिण्याच्या पाण्याची व्यवसथा, लाईटची व्यवस्था, बसण्यासाठी सिमेंट बेंच, रंगरगोटी, ग्रामपंचायत व उपकेंद्र मार्फत विविध आरोग्य शिबीर राबविण्यात आले, ग्रामपंचायत, जि. प. शाळा, धार्मिक स्थळें व गावाअंतर्गत सुरक्षितेसाठी सी. सी. टीव्ही कॅमेरे बसवण्यात आले तसेच शासकीय इमारतीना रेन हार्वेस्टिंग चे काम व गावामध्ये करवसुली करण्यात येत आहे तसेच लोकसहभागातून श्रमदान करून वनराई बंधारा उभारण्यात आला. या उपक्रमासाठी सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा ग्रामपंचायत कोलंबीचे कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी टी. जी. पाटील रातोळीकर, ग्रामपंचायत कर्मचारी, गावातील सर्व विभागाचे कर्मचारी तसेच गावातील सर्व नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

## वन विभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा अन्यथा

# शिवसेनेचे वाघ कार्यालयात सोडू- जिल्हाप्रमुख बबनराव बारसे

अर्धापूर (प्रतिनिधी) जिल्ह्यात सध्या बिबट्याने धुमाकूळ सुरू आहे वनविभाग बघायची झोपेचे सोंग घेत आहे.वनविभागाने तात्काळ कारवाई करावी अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करून शिवसेनेचे वाघ वन विभागाच्या कार्यालयात सोडण्याचा इशारा ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी दिला आहे.



नांदेड जिल्ह्यात बिबट्याचा धुमाकूळ सुरू आहेत.वनविभाग व सरकार वेळकाढू धोरण अवलंबित आहे.तर बिबट्याच्या हल्ल्यामुळे शेतातील कामासाठी कोणीच रोजदार मिळत नाहीत सालगडी भितीमुळे कामे करीत नसल्याने शेतकरी वर्गात भितीचे वातावरणात असल्यामुळे शेतीतील कामे खोळंबली आहेत.सरकार बिबट्याला जेरबंद करण्यासाठी कोणतेच पावले उचलत नाही. शासन व वनविभाग माणसे मरण्याची वाट बघत आहेत काय असा सवाल ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी केला आहे. अर्धापूर तालुक्यातील बारसगाव येथे बिबट्याने बैलावर हल्ला करून मारण्याचा प्रयत्न केला होता. या हल्ल्यात बैल गंभीर जखमी झाला असून बैलाला चाराही खाता येत नाही. बामणी शिवारात वासराच्या फट्या पडल्या होत्या.तर रोडगी,पांगरी,निमगाव शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात अनेक जनावरे दगावली आहेत वन विभाग म्हणतो की हा बिबट्याचा हल्ला नसून दुसऱ्यास कशाने तरी हल्ला केल्याची बनवाबनवी करून वेळ मारून नेत आहेत.

मागील आठवड्यात बिबट्या निवघा शिवारात आढळल्याचे व्हिडिओ समाज माध्यमावर प्रसिद्ध झाले होते. वनविभाग कुंभकर्ण झोपेत असून माणसे मारल्याने बिबट्याचा बंदोबस्त करणार काय असा सवाल वनविभागाला जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी केला आहे पंधरा दिवसाच्या बिबट्याचा बंदोबस्त करा अन्यथा शिवसेनेचे वाघ वन विभाग कार्यालयास सोडू असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी वन विभागाला दिला आहे.

# बोधडी येथील अंधविद्यालयात लुईस ब्रेल जयंती उत्साहात साजरी ; भव्य रॅलीने वेधले ग्रामस्थांचे लक्ष



किनवट (प्रतिनिधी)

ब्रेल लिपीचे जनक लुईस ब्रेल यांच्या जयंतीनिमित्त आज बोधडी येथील अंधविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी काढलेल्या भव्य रॅलीने आणि सांस्कृतिक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात लुईस ब्रेल यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. तत्पूर्वी, विद्यार्थ्यांनी गावातून भव्य रॅली काढली होती. लुईस ब्रेल यांचा विजय असो, शिक्षण आमच्या हक्काचे अशा घोषणा देत या अंध विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. रॅलीनंतर विद्यालयात मुख्य कार्यक्रम पार पडला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी लुईस ब्रेल यांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी भाषणे केली आणि सुश्राव्य संगीताच्या माध्यमातून त्यांना आदरांजली वाहिली.

याप्रसंगी संस्थेच्या सहसचिव सौ. नंदिनी तारपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, लुईस ब्रेल यांनी शोधून काढलेली ब्रेल लिपी ही अंधांच्या आयुष्यातील प्रकाशाची किरणं ठरली आहे. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही संकट दूर करता येते, हेच ब्रेल यांच्या जीवनातून आपल्याला शिकायला मिळते.

या कार्यक्रमाला विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंधविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.